# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ / श्रावण २०, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६८**

---

## शासनाने विदर्भातील १९६ महाविद्यालये बंद करण्याचा घेतलेला निर्णय

**(१) * ८५५८३ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विदर्भातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या तीन विद्यापीठांतर्गत १९६ महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर महाविद्यालये बंद केल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) विद्यार्थी संख्येचा अभाव तसेच महाविद्यालयांनी सलंग्निकरण न केल्यामुळे, संबंधित महाविद्यालये बंद करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरोरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नळ योजनेद्वारे दूषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(२) * ९४३७० श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर)तालुक्यातील नागरी ग्रामपंचायतद्वारा पाणी पुरवठा करीत असलेल्या नळ योजनेद्वारे दूषित पाणी पुरवठा होत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे परिसरातील नागरिकांना गॅस्ट्रो, काविळ अशा साथीच्या रोगाची लागण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी नागरिकांना शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याकरिता तसेच साथीच्या रोगावर नियंत्रण मिळविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मौजा नागरी, (ता.वरोरा, जि.चंद्रपूर) या गावात स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे सुरळीत पाणी पुरवठा होत आहे. सदर गावात साथीचे रोग उद्भवलेले नसून, गावातील सर्व सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत निर्जंतुकीकरण करुन ग्रामपंचायतीमार्फत शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पन्हाळा व शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यांतील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत

**(३) * ९२११९ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा( जि.कोल्हापूर) तालुक्यात एकूण ११४ प्राथमिक शाळा असून २० प्राथमिक शाळांच्या इमारती धोकादायक असल्याचे तसेच शाहुवाडी तालुक्यात एकूण २७४ प्राथमिक शाळा असून अनेक शाळांच्या इमारती धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उदगिरी पैकी गुरववाडी शाळा पूर्णपणे पडली असून तसेच पावसाळ्यात अन्य इमारती कोसळण्याची शक्यता असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणामुळे जिल्हा परिषद शाळांचा पट घटत चालला असून पालकांचा कल खाजगी शाळांकडे वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यांतील प्राथमिक शाळांच्या इमारती दुरुस्त करणेबाबत किंवा नवीन इमारत बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

पन्हाळा तालुक्यात २० प्राथमिक शाळांच्या इमारती व शाहुवाडी तालुक्यात ३६ शाळा इमारती धोकादायक आहेत.

(२) हे खरे नाही.

वि.मं.गुरववाडी, ता.शाहूवाडी येथील ३ वर्गखोल्यांची इमारत दि.१५/०५/२०१७ रोजी भूकंपामुळे पडली आहे. शाळेतील मुलांची सुरक्षित इमारतीत बसण्याची व्यवस्था केली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

पालकांचा कल खाजगी शाळांकडे असून जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या कमी झाली आहे.

(४) सन २०१७-१८ साठी जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषदेच्या शाळांच्या इमारतींच्या दुरूस्तीकरिता रू.२५० लक्ष तसेच वर्गखोली बांधकामासाठी रू.५० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत धोकादायक शाळांमध्ये १६ वर्गखोल्या, ७ नवीन वर्गखोल्या व १५ शाळा इमारत दुरूस्ती इ. बांधकामे सुरू आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योगांमुळे होत असलेले पाणी व ध्वनी प्रदूषण नियंत्रित करणेबाबत

**(४) * ९१६४८ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात उद्योगांच्या रसायनामुळे नद्यांचे पाणी प्रदूषित झाल्याचे तसेच शहरातील ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण वाढत असल्याची बाब दिनांक ८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात उद्योगांच्या रासायनिक पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता नद्यांमध्ये सोडले जात असल्याने इरई नदीवरील जलशुध्दीकरण केन्द्रातून नागरिकांना प्रदूषित पाण्याचा पूरवठा होत असल्याचे तसेच ध्वनीप्रदूषणामुळे नागरीकांची श्रवणशक्ती कमी होणे, मानसिक ताण वाढणे, निद्रानाश, मानसिक आजार अशा विविध प्रकारचे आजार होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात प्रदूषण करणाऱ्या संबंधित कंपन्यांवर प्रदूषण मंडळाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी कंपन्यांवर कोणती कारवाई केली व जिल्ह्यातील प्रदूषण नियंत्रित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे माहे जून महिन्यात नदीच्या संकलित पाण्याच्या नमुन्यांच्या पृथ:करण अहवालानूसार या कालावधीत नदीचे पाणी प्रदूषित झालेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांस काही अटी व शर्तींच्या अधीन राहून संमतीपत्र प्रदान करण्यात येते. सदर संमतीपत्रातील अटी व शर्तींच्या उल्लंघनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरणीय कायद्यातील तरतूदीनूसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जुन्नेर व बेहेड (जि.धुळे) येथे निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई

**(५) * ८५२६३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नेर (जि.धुळे) येथे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने उक्त ठिकाणी पाणीपुरवठयासाठी टँकर मंजूर करण्यात आला नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच बेहेड (ता.साक्री, जि.धुळे) येथे दरवर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत असल्यामुळे यावर्षी लाटीपाटा धरणाचे पाणी खाप-या - कुप-या पाझर तलावात सोडावे अशी मागणी येथील ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासनाकडे केली असल्याचे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रश्न भाग (१) मधील गावाला टँकर मंजूर करण्याबाबत व प्रश्न भाग (२) मधील ग्रामस्थांच्या मागणीबाबत व उक्त गावे कायमस्वरुपी पाणी टंचाई मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सन २०१६-१७ मधील पाणी टंचाई कार्यक्रमा अंतर्गत जुन्नेर गावास जिल्हाधिकारी, धुळे यांच्या दि. ३१.०३.२०१७ च्या आदेशान्वये तात्पुरती पुरक नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली. सदर योजना दिनांक ०९.०५.२०१७ रोजी कार्यान्वित करुन गावाचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यात आलेला आहे.

तसेच लाटीपाडा धरणातून खापऱ्या - कुपऱ्या पाझर तलावात दि. २९.०३.२०१७ रोजी ४० एम. सी. एफ. टी. पाणी सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील पंचगंगा नदी प्रदूषणमुक्त करणेबाबत

**(६) * ८६६६५ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४९ नद्यांचे पाणी प्रदूषित झाल्याने नगरपालिका व महानगर पालिकांनी त्याच्या अर्थसंकल्पातील २५ टक्के निधी नद्यांच्या संवर्धन व प्रदूषणमुक्ती करण्यासाठी वापरावा असे आदेश मा. पर्यावरण मंत्री यांनी दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले होते परंतु कोणत्याही नगरपालिका व महानगर पालिकांनी त्या आदेशाचे पालन केले नसल्याची बाब दिनांक १८ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर येथील पंचगंगा नदीतील प्रदूषण दिवसेंदिवस वाढत चालले असून कोल्हापूरातील जयंती नाल्यातील प्रदूषित पाणी थेट पंचगंगा नदीत सोडल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिका आयुक्तांना दिनांक ८ जून, २०१७ रोजीच्या सुमारास नोटीस बजावली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने ७४ कोटी निधी उपलब्ध करून दिला असला तरी सदर निधीचा विनियोग योग्य त-हेने होत नसल्याची बाब दिनांक १८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली हे ही खरे आहे काय,

(४) तसेच कोल्हापूर जिल्हा परिषदेने ३९ गावांसाठी मागितलेल्या १०८ कोटी निधीचा प्रस्ताव पाच वर्षे, नृसिंहवाडीत स्वच्छता प्रकल्पासाठीच्या सव्वातीन कोटी रुपये निधीचा प्रस्ताव मागील वर्षभरापासून तर पंचगंगा नदीतील प्रदूषण रोखण्यासाठीचा प्रस्ताव गेल्या सहा-सात वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही तथा कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) जयंती नाल्यामधील घरगुती सांडपाणी भरुन वाहत असल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जयंती नाल्याचे भरुन वाहत असलेले सांडपाणी तातडीने अडविण्यासाठी व थांबविण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेस कळविण्यात आले होते.

सदरच्या अनुषंगाने महानगरपालिकेने याबाबत कार्यवाही केल्याचे कळविण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

• जिल्हा परिषद, कोल्हापूरमार्फत ३९ गावांचा समावेश असलेला रु. १०८ कोटींचा सविस्तर प्रस्ताव विभागामार्फत केंद्र शासनास दिनांक २४/११/२०१४ रोजी मंजूरीस्तव पाठविण्यात आला होता. तथापि, केंद्र शासनाने फक्त अतिप्रदूषित शहरी भागांचे प्रस्ताव हाती घेत असल्याने सदर प्रस्ताव नामंजूर करण्यात आलेला आहे.

• सद्यस्थितीत ३९ गावांपैकी लोकसंख्येने मोठ्या असलेल्या ६ गावांचा व कोडोली (ता. पन्हाळा) अशा एकूण ७ गावांसाठी सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प नाबार्ड मार्फत राबविण्यात येत आहे.

• जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेमार्फत उर्वरित ३० गावांचा सांडपाणी व ३८ गावांचा घनकचरा व्यवस्थापन यासाठी एकूण रु. ९४.५० कोटीच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्याबाबतचे पत्र दिनांक ०६/०६/२०१७ रोजी पर्यावरण विभागास प्राप्त झाले. सदर पत्रासोबत प्रकल्प अहवाल जोडण्यात आलेला नसल्याने सदरबाबत जिल्हा परिषदेस विभागाच्या दिनांक १५/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

• नृसिंहवाडी स्वच्छता प्रकल्प पर्यावरण विभागास प्राप्त नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तलवाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील भारत निर्माण योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याबाबत

**(७) * *८८३२१*  श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळाखांबेपासून ७ कि.मी. अंतरावर असणाऱ्या तलवाडा ग्रामपंचायत हद्दीतील रोडवहाळ, गांडूळवाडा या आदिवासी पाड्यातील भारत निर्माण योजनेअंतर्गत १ कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना दहा वर्षांचा कालावधी उलटून अपूर्ण असल्याचे व सदर पाड्यातील महिलांना अद्यापही पाण्यासाठी ५ कि.मी.ची पायपीट करावी लागत असल्याचे दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेत बनावट कागदपत्रे तयार करून लाखो रुपयांचा अपहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावंर कोणती कारवाई केली तसेच उक्त योजना पूर्ण करून कायमस्वरूपी पाणी पुरवठा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील डोळखांब येथील अस्तित्वातील साकुर्ली नळ पाणी पुरवठा योजनेची जॅकवेल हा उद्भव घेऊन वर्धित वेग कार्यक्रमांतर्गत सन २००८-०९ मध्ये तलवाडा, रोडवहाळ व रोडवहाळपाडा योजना अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७४.५८ लक्ष व गांडूळवाडा नळ पाणी पुरवठा योजना अंदाजपत्रकीय रक्कम रु. २२.५२ लक्ष मंजूर आहे.

सदर दोन्ही योजना अद्याप आर्थिक व भौतिकदृष्टया अपूर्ण आहेत. परंतू या योजनांतून आवश्यकतेनुसार बायपासद्वारे ४-५ वर्षापासून पाणी पुरवठा सुरु आहे. सद्य:स्थितीत डोळखांब विभागात वादळाने विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने योजनेचा पाणी पुरवठा पूर्ववत होऊ शकला नाही. दरम्यान तलवाडा येथे असलेल्या लघु नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे दोन साध्या विहिरी व दोन विंधन विहिरीद्वारे, रोडवाहाळ येथे एका विंधन विहीरीद्वारे तसेच गांडूळवाडा येथे अस्तित्वातील तीन साध्या विहिरी व एक विंधनविहीरीद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

वितरीत केलेला निधी व कामाचे झालेले मुल्यांकन यात आर्थिक तफावत नाही.

(४) सदर योजनेचे किरकोळ काम बाकी असुन योजना पुर्ण करुन घेण्यासाठी संबंधित समितीच्या अध्यक्ष व सचिव यांची सुनावणी घेण्यात येऊन योजना अंतिम करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या लेटरहेडवर बोगस नियुक्ती आदेश देण्यात आल्याबाबत

**(८) * ९०५८७ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील लिपीक सौ. रंजना जगदाळे यांनी एका तरुणाकडून शिपाई पदाची नोकरी लावून देण्यासाठी १० लाख रुपये घेवून विद्यापीठातील फाईन आर्ट विभागात पाच दिवस ड्यूटी दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सौ.जगदाळे यांनी विद्यापीठाच्या लेटर हेडवर विद्यापीठाचे बोधचिन्ह व नाव वापरलेले बोगस नियुक्तिपत्र दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) विद्यापीठातील नमूद लिपीक यांनी अनेक तरुणांना विद्यापीठात नोकरी लावून देते म्हणून त्यांच्याकडून लाखो रुपये घेऊन तरुणांची फसवणूक केल्याची तक्रार नमूद विद्यापीठात प्राप्त असून त्यासोबत विद्यापीठाच्या लेटर हेडवर विद्यापीठाचे नाव व बोधचिन्ह असलेले नियुक्ती आदेशाची प्रती जोडलेल्या आहेत, हे खरे आहे. तथापि, विद्यापीठ प्रशासनाने सदर आदेशातील व्यक्तीस नियुक्ती दिलेली नाही.
(३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाने संबंधित लिपीकाकडून लेखी खुलासा घेतला असून प्रकरणी विद्यापीठ स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

तसेच फसवणूक झालेल्या व्यक्तीने संबंधित लिपीका विरुध्द पोलीस स्टेशन, सिटी चौक, औरंगाबाद येथे गु.र.नं. २३७/१७ दाखल केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पेन्शन योजनेमधील वयोवृध्द कलाकारांचा कोटा वाढविण्याबाबत

**(९) * ८६४१८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सांस्कृतिक व कार्य विभागाची वयोवृध्द कलाकारांना पेन्शन देण्याची योजना असून उक्त योजनेमधील कलाकारांना मिळणारा ६० हून अधिक कोटा वाढविण्याची मागणी मा. सांस्कृतिक कार्यमंत्री यांचेकडे कोल्हापूर जिल्हयातील लोककलाकर संघातर्फे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वयोवृध्द कलाकारांना मानधन देण्याकरीता जिल्हापरिषदेच्या निवड समितीकडून छाननी करून पेन्शन मंजूर करण्यात येते मात्र जिल्हयामध्ये कलाकार मानधनाकरीता येणाऱ्या अर्जाची संख्या जास्त असून शासनाने कोटा वाढविण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त कोटा वाढविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील राज्यस्तरीय समितीने काढलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत

**(१०) * ९२४५४ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील १७ कोटी ७७ लाख रुपयांच्या सात पाणी पुरवठ्याच्या योजनांमध्ये राज्यस्तरीय समितीने त्रुटी काढल्या असून पाच महिन्यांचा कालावधी उलटुनही उक्त त्रुटींची पुर्तता झाली नसल्यामुळे विविध गावात पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त त्रुटींची पुर्तता होत नसल्यामुळे विविध गावांतील गावकऱ्यांना उन्हाळ्यात पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त त्रुटींची पूर्तता करून पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील निम्म्याहून अधिक पीएच.डी प्रबंध तसेच पदवीधर बोगस असल्याबाबत

**(११) * ८४९४० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात निम्म्याहून अधिक पीएच.डी प्रबंध तसेच पदवीधर बोगस असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून याबाबत मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनीही दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास जाहिरपणे व्यक्त केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मोहनदास पै समितीच्या अहवालानुसार राज्यातील पीएच.डी.पैकी १३ टक्के प्रबंधांचे संदर्भ (सायटेशन) वापरले जातात असेही मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार राज्यात बोगस पीएच.डी प्रकरणे घडू नयेत याकरिता कोणती कार्यवाही केली, तसेच बोगस पीएच.डी पदव्या देण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) राज्यात अर्ध्याहून अधिक पी.एच.डी. प्रबंध तसेच पदवीधर बोगस असल्याचे जाहीरपणे व्यक्त केले हे खरे नाही.
(२) मोहनदास पै समितीचा अहवाल माझ्या निदर्शनास आणण्यात आला हे खरे आहे.
(३) राज्यात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पी.एच.डी. प्रवेशाबाबत कार्यवाही केली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रवरा संगम आणि इतर तीन गावातील (जि. अहमदनगर) पाणी पुरवठा योजनेची कामे न करताच कामाची देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(१२) * ९४५०४ श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रवरा संगम आणि तीन गावे (जि. अहमदनगर) पाणी पुरवठा योजनेचे आराखडयाप्रमाणे जॅकवेलचे काम, पंपहाऊस, नदीपात्र ते जलशुध्दीकरण केंद्र, फिल्टर प्लांट ते मुख्य जलकुंभ, वितरण व्यवस्था यापैकी एकही काम प्रत्यक्षात न करताच उक्त कामाची देयके अदा करण्यात आल्याची माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पाणी पुरवठा योजनेच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, असल्यास, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व उक्त योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.
सदरील योजनेची कामे पूर्ण करुन योजना पुढील देखभाल दुरुस्तीसाठी ग्रामपंचायत प्रवरा संगम कडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत योजनेद्वारे पाणी पुरवठा चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सर्वशिक्षा अभियानाचा कोट्यवधी रुपयांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१३) * ९२६८५ श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ जिल्हयातील महानगरपालिका व जिल्हा परिषदांना सर्वशिक्षा अभियानाचे विविध उपक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाकडून गतवर्षी १ हजार ८९४ कोटी ८४ लाखांचा निधी देण्यात आलेला असून केवळ १ हजार ५३९ कोटी ७२ लाखांचा निधी खर्च झाल्याने ३५५ कोटी १२ लक्ष रुपयांचा निधी अखर्चित राहिल्याची बाब दिनांक ९ जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच शाळांनी निधीचा योग्य विनियोग केला नसल्याने शाळांचे नुकसान होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व शिक्षा अभियानाला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होऊनही अंमलबजावणीकर्त्यांच्या उदासिनतेमुळे बराचसा निधी खर्च केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित एजन्सीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवीन पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सेंट जोसेफ शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराबाबत**

**(१४) * ९३१७६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सेक्टर ७ मधील सेंट जोसेफ शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी शाळेच्या बसची फी भरली नसल्याने शाळा व्यवस्थापनाने दोन विद्यार्थ्यांना शाळेतच उपाशीपोटी बसवून ठेवले असल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेच्या फी वाढीच्या मुद्दयावरून तसेच शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराच्या विरोधात विद्यार्थ्यांच्या पालकांनी वारंवार आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक शाळेच्या बसच्या फीचे रुपये १५००० भरण्यासाठी गेले असताना शाळा व्यवस्थापनाने संगणकीय बिघाड झाले असल्याचे कारण सांगून बस फीची रुपये १५००० ची पावती देण्यास नकार दिल्याने पालकांनीही बस फी भरण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शाळा व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) होय.

(३) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) शुल्क वाढीबाबत संदर्भात विभागीय शुल्क नियामक समितीपुढे सुनावणी चालू आहे. शाळेच्या व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## सांगली जिल्हयातील पाणी पुरवठा योजना

**(१५) * ९१५५६ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील विशेषत: खानापूर व आटपाडी तालुक्यामध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याने तसेच दुषित पाणीपुरवठा होत असल्यामुळे नवीन पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री व मा. पाणीपुरवठा व स्वच्छता, राज्यमंत्री यांना दिनांक २ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील विसापूर, जाधववाडी, बाणूरगड आणि माधवनगर प्रादेशिक योजना गत चार महिन्यांपासून बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजना बंद असण्याची कारणे काय आहेत व असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजना तातडीने सुरु करण्याकरीता व प्रश्न भाग (१) मधील नवीन पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत खानापुर, आटपाडी तालुक्यातील गावांचा समावेश होवून मंजूरी मिळणेबाबत लोकप्रतिधींनी मा.ना. राज्यमंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे दि.०२/०५/२०१७ रोजी लेखी निवेदन दिलेले आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

विसापूर तालुक्यातील नळ पाणी पुरवठा योजना दि.१०/०३/२०१७ पासून बंद आहे. जाधववाडी व बाणुरगड तालुका खानापुर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना दि.२९/०९/२०१३ पासून बंद आहेत. माधवनगर तालुका मिरज प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना दि.१४/०७/२०१७ रोजी सुरु करणेत आली.

(३) विसापूर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना दि.१०/०३/२०१७ पासून वीज देयकाच्या थकबाकीमुळे बंद आहे. याबाबत तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर सदर योजनेची मुळ मुद्दलाच्या थकबाकीची रक्कम भरणे बाबत बैठका घेऊन प्रयत्न करण्यात आले.

जाधववाडी व बाणुरगड या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचा उद्भव सिध्देवाडी तलाव लघुपाटबंधारे तलाव कोरडा असल्याने व योजनेत समाविष्ट गांवाची मागणी नसल्याने योजना बंद आहेत. जाधववाडी, बाणुरगड योजना या मागणी अभावी बंद आहेत. योजनेमधून दि.१५/०४/२०१३ ते २०/०९/२०१३ या टंचाई कालावधीत पाणी पुरवठा करणेत आला होता.

तसेच माधवनगर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेतून सध्या पाणी पुरवठा सुरु आहे. माधवनगर प्रादेशिक योजनेची वीज देयकाची थकबाकीची रक्कम ३० हप्त्यात भरणे बाबत शिखर समितीची मागणी प्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करणेत आला होता. शासनाने सदरची थकबाकी १५ हप्त्यामध्ये भरणेस मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केज (जि.बीड) तालुक्यातील ग्रामीण भागातील नादुरुस्त असलेले हातपंप दुरुस्त करणेबाबत

**(१६) * ८७४१६ श्रीमती संगीता ठोंबरे (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) तालुक्यातील ग्रामीण भागातील तब्बल १७२ हातपंप नादुरुस्त असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी हातपंपावर अवलंबून असलेल्या नागरिकांना २-३ कि.मी. इतक्या अंतरावरून पिण्याचे पाणी आणावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्याने, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार १७२ हातपंप दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) केज तालुक्यामध्ये माहे जून -२०१७ च्या प्रगती अहवालानुसार एकुण ७०६ हातपंप असून त्यापैकी १७३ हातपंप कायमस्वरुपी बंद असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) उक्त १७३ हातपंप हे दुरुस्त होण्यालायक नाहीत. तथापि हातपंप कायमस्वरुपी बंद असलेल्या गावांमध्ये विशेष घटक योजना स्थानिक विकास कार्यक्रम योजनेतून बोअर घेऊन हातपंपाद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त पंचायत समिती, केज यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये ६ हातपंप नादुरुस्त झाल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करुन हे ६ हातपंप त्याच महिन्यात दुरुस्त करुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे तेर, ढोकी, तळवडा व येडशी (जि. उस्मानाबाद) या चार गावांसाठीची पाणी पूरवठा योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(१७) * ८७५४८ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे तेर, ढोकी, तळवडा व येडशी (जि. उस्मानाबाद) या चार गावांसाठी तेरणा मध्यम प्रकल्पातुन महाराष्ट्र जीवन प्रधिकरणाकडून राबविण्यात येणारी नळपाणी पुरवठा योजना गत ३ ते ४ वर्षांपासून भीषण दुष्काळ व थकित वीजबिलामुळे बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पुर्ववत सुरु करण्यासाठी येडशी-लातूर राज्यमहामार्गावर उक्त चार गावातील ग्रामस्थांनी दिनांक १९ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास रास्तारोको आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर उपाय म्हणुन तत्कालीन मा.पालकमंत्री यांच्याकडून सदर थकित वीज बिलाची रक्कम नियोजन समितीकडून उपलब्ध करुन देण्यासाठीचा एकमूखी ठराव दिनांक २२ डिसेंबर,२०१६ रोजीच्या नियोजन बैठकीत घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त निधी उपलब्ध करण्याकरिता व उक्त योजना पूर्ववत सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदर निधी कैंव्हापर्यन्त देण्यात येईल,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या जिल्हा स्तरीय योजनांमध्ये सदर योजनेचा समावेश नसल्यामुळे या कामासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करणे शक्य होणार नाही. सदर योजनेतील समाविष्ट गावांना त्यांच्या जून्या योजनेतून पाणी पुरवठा सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील दुष्काळग्रस्त भागातील विद्‌यार्थ्यांना देण्यात येणारे शुल्क माफीचे धनादेश त्वरित मिळणेबाबत

**(१८) * ९०४९० श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील ४२ शाळांनी दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे शुल्क माफीचे २३८८ विदयार्थ्यांचे धनादेश शिक्षण विभागाकडून प्राप्त करुन घेतले नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शुल्क माफीचे धनादेश त्वरीत मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व २) हे खरे नाही. अकोला जिल्हयातील टंचाईग्रस्त भागातील ८०८७ विद्यार्थ्यांपैकी ७४०५ विद्यार्थ्यांची पूर्ण माहिती उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना धनादेश/आर.टी.जी.एस.द्वारे परीक्षा शुल्क अदा करण्यात आले आहे. उर्वरीत ६८२ विद्यार्थ्यांबाबत त्रुटी असलेली यादीसुध्दा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद अकोला यांचेकडे त्रुटी पूर्ततेसाठी देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), अकोला यांचे स्तरावर कोणताही धनादेश प्रलंबित नाही.

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे शुल्क माफीचे धनादेश विद्यार्थ्यांच्या नावे असल्याने विद्यार्थ्यांना धनादेश प्राप्त होण्याकरिता शिक्षणाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर शाळांचे शाळा सांकेतांक क्रमांकासह यादी एप्रिल महिन्यात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार अकोला जिल्हयातील शाळांचे मुख्याध्यापकांनी सर्व धनादेश प्राप्त करुन घेतले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात व्यायामशाळा साहित्य खरेदी व बांधकाम अनुदान वाटपात झालेला गैरव्यवहार

**(१९) * ८६९२६ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्ह्यात क्रीडा विभागाच्या माध्यमातून सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये व्यायामशाळा साहित्य खरेदी व बांधकाम अनुदान वाटपात गैरव्यवहार झाले असल्याचे दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,असल्यास, त्यानुसार साहित्य व बांधकाम अनुदान वाटपात गैरव्यवहार करणा-या संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) व्यायामशाळा विकास अनुदान योजना ही अनुदान मंजूर झाल्याचे संबंधीत संस्थेस कळविल्यापासून दोन वर्षात पूर्ण करावयाची असल्याने, त्यानंतर संस्थेचा अहवाल प्राप्त झाल्यावर तपासणी अंती याबाबत अंतिम स्थिती सादर करण्यात येते. तसेच व्यायाम साहित्य खरेदी बाबत संपूर्ण प्रक्रीया तपासून पाहणे व साहित्य पुरवठा अहवाल याबाबत अनुदानीत संस्थांची तपासणी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती यांचे मार्फत करण्यात येवून तपासणी अहवालातील निष्कर्षानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि. अमरावती) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये शालेय पोषण आहार योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२०) * ९१६७६ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि. अमरावती) जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये शालेय पोषण आहार योजनेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून दरवर्षी लेखापरिक्षण करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत एकंदरीत किती प्राथमिक शाळांचे लेखापरिक्षण करण्यात आले असून त्यापैकी किती प्राथमिक शाळांमध्ये पोषण आहार योजनेत गैरव्यवहार झालेला आहे,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सदर योजनेंतर्गत जिल्हा परिषदेने स्थापन केलेल्या दक्षता पथक तपासणीत तसेच, लेखा परिक्षणामध्ये योजनेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार आढळून आला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील सरळगांव ग्रामपंचायत क्षेत्रातील आदिवासी पाड्यांना बारवी धरणातून पाणी पुरवठा करण्याबाबत

**(२१) * ९२३८९ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील बारवी धरणापासून नजीक असलेल्या सरळगांव ग्रामपंचायत क्षेत्रात येणाऱ्या ९ आदिवासी पाड्यात भीषण पाणी टंचाईमुळे आदिवासींना पाण्यासाठी वणवण करावी लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने बारवी धरणातून सदर आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करून पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

सरळगांव ग्रामपंचायत अंबरनाथ तालुक्यामध्ये नसून मुरबाड तालुक्यामध्ये आहे व बारवी धरणापासून अंदाजे २० किं.मी. अंतरावर आहे. ग्रामपंचायती अंतर्गत ३ महसुल गावे व ९ पाडे असून त्यामध्ये ४ आदिवासी पाडे आहेत.

सदर गाव/पाडयांमध्ये अस्तित्वातील पाणी पुरवठा साधनांमधून पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध असल्याने मागील ७ वर्षामध्ये टँकरची मागणी प्राप्त झालेली नाही.

(२) सरळगांव ग्रामपंचायतीमध्ये ९ हातपंप, ७ साध्या विहिरी व १ विंधन विहिरवरुन विद्युतपंप योजना व २ स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित आहेत. तसेच ग्रामपंचायतीमधील ८ पाडयांसाठी सन २०१०-११ मध्ये डोईफोडी नदी उद्भव घेऊन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजना मंजुर करण्यात आली असून योजनेमधुन पाणीपुरवठा देखील सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तोंडगाव (ता. चांदूरबाजार, जि. अमरावती) ग्रामपंचायत येथे शौचालयाच्या अनुदानात झालेला गैरव्यवहार

**(२२) * ९३३४३ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोंडगाव (ता.चांदूरबाजार, जि.अमरावती) ग्रामपंचायत येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालयाच्या अनुदानात बोगस लाभार्थी दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक १४ डिसेंबर,२०१५ रोजी वा त्यासुमारास पंचायत समिती, गट विकास अधिकारी, चांदूरबाजार यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) प्राप्त तक्रारीची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,अमरावती मार्फत चौकशी केली असता,ग्रामपंचायत नमुना-८ वर ४ कुटुंबाची मालमत्ता नसताना वैयक्तिक शौचालयाचे प्रोत्साहनपर अनुदानाचा लाभ देणे, वैयक्तिक शौचालयाचे यादीमध्ये इतर प्रवर्गाच्या कुटुंब प्रमुखाच्या नावासमोर एस.सी. प्रवर्ग नमूद करणे, अशा प्रकारे अनियमितता घडल्याचे निदर्शनास आले आहे.सदर अनियमिततापायी सबंधित ग्रामसेवक यांची जबाबदारी निश्चित करण्यात येवून त्यांची एक वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता दिनांक १५/०२/२०१७ च्या आदेशान्वये रोखण्यात आली आहे व शासन अनुदान रूपये २४,०००/-तीन समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील नळ पाणीपूरवठा योजना नगरपंचायतीकडे हस्तांतरीत करण्याबाबत

**(२३) * ८८८७९ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेअंतर्गत सन २०१५ मध्ये रूपये ४ कोटी ८८ लाख निधी योजनेसाठी मंजूर करून पंचायत समिती पाणीपुरवठा विभाग व नगरपंचायत यांचेकडे प्रलंबित असल्याने उक्त योजना यशस्वी झाली नसल्याचे दिनांक २६ मे २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पाणी साठविण्यासाठी असलेल्या पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण होऊन दोन वर्षाचा कालावधी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणीपुरवठा होत नसतानाही पाणीपट्टी आकारणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त ठिकाणी सुरळीत पाणी पुरवठा करण्याकरिता व सदर योजना नगरपंचायतीकडे हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ मध्ये पालघर जिल्हयातील तलासरी तालुक्यातील ग्रामपंचायत तलासरी करीता रुपये ४ कोटी ८८ लक्ष किंमतीची नळ पाणीपुरवठा योजना मंजुर करण्यात आली. सदर योजनेचे काम पुर्ण असून पाणीपुरवठा सुरु आहे. सदर योजना मार्च, २०१८ पर्यंत ठेकेदारामार्फत चालविण्यात येणार असून सदर कालावधी पुर्ण झाल्यानंतर योजना नगरपंचायतीस हस्तांतरीत करण्यात येणार आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) योजना पुर्ण करण्याचा कालावधी संपुष्टात येण्याआधीच तलासरी नगरपंचायत झाल्याने ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अथवा ठेकेदार यांचेमार्फत कोणत्याही प्रकारची पाणीपट्टी आकारण्यात येत नाही. तसेच पाणी उपलब्ध असल्याने पाणीटंचाई नाही.
(४) माहे मार्च २०१८ पर्यंत काम पुर्ण करुन योजना नगरपंचायतीकडे हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * ९३१३६ अ‍ॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर, पोंभूर्णा, भद्रावती, चिमूर, वरोरा, राजुरा, कोरपना, जिवती, सिंदेवाही, मूल, सावली, नागभीड येथील पाणीपूरवठा

योजनांचे ७ कोटी ३४ लक्ष रूपयांची कामे प्रलंबित असल्याचे दिनांक ३ जून २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. केंद्रीय गृहमंत्री यांच्या अध्येक्षतेखाली चंद्रपूर येथे झालेल्या पाणीपुरवठा आढावा बैठकीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चंद्रपूर जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत गत तीन वर्षापासून ३७ योजना प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आढावा बैठकीत संबंधीत अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना जिल्हयातील दुर्गम भागामध्ये मंजूर झालेल्या योजनांसह पाणीपूरवठा संदर्भातील सर्व प्रलंबित योजनांचा अहवाल एक महिन्यात सादर करण्याचे ठरले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्याअनुषंगाने जिल्हयातील प्रलंबित पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) होय.

यासंदर्भात निवासी जिल्हाधिकारी यांनी दिनांक ३/६/२०१७ अन्वये उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अभियंता, गट विकास अधिकारी व शाखा अभियंता यांची समिती नियुक्त केली असून, सदर योजनांबाबत वस्तुनिष्ट अहवाल सादर करण्याचे कळविण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, प्रलंबित पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी ज्या योजनांना निधी उपलब्ध आहे अशा योजना शौचालय बांधकामासाठी पाठपुरावा करणे, समितीमधील वाद निवारण करणे व कंत्राटदाराकडून कामे पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर उत्तर विभागातील महालक्ष्मी उच्च प्राथमिक शाळेतील इमारतीत कापड कारखाना चालू करण्यात आल्याबाबत

**(२५) * ८९५६१ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर उत्तर विभागातील आनंदनगर येथील महालक्ष्मी उच्च प्राथमिक शाळा व विदयालयाच्या इमारतीत कापड कारखाना चालू करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भाची तक्रार नागपुर जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे सभापती यांच्याकडे प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कारखान्यामुळे विदयार्थांच्या जिविताला धोका निर्माण झाला असून शाळा प्रशासन व संचालक मंडळाच्या संगनमताने उक्त कारखाना सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय काढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही. शिक्षण सभापती जिल्हा परिषद, नागपूर यांनी वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने पत्राव्दारे शिक्षणाधिकारी कार्यालयास कळविले होते.

(३) हे खरे नाही. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर शाळेस भेट देऊन कारखाना हटविण्याचे निर्देश दिले व त्याप्रमाणे कारखाना हटविण्यात आला आहे.

(४) क्षेत्रिय अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथे शिधावाटप धान्याचा होत असलेला काळाबाजार

**(२६) * ८६६५८ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथे मार्केट कमिटीजवळ एका नवीन बांधकाम केलेल्या घरांमध्ये ९२ शिधावाटपाच्या गव्हाची पोती पोलिसांनी घातलेल्या छाप्यामध्ये आढळून आल्याने उक्त शिधावाटप धान्याचा काळा बाजार औंढा तालुक्यातील इतर ठिकाणी सुरु असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील शिधावाटप धान्याचा होत असलेल्या काळ्या बाजाराची तसेच पुरवठा विभागाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) व (३) पोलीस उपनिरिक्षक, औंढा नागनाथ व पोलीस निरिक्षक, उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय ग्रामीण हिंगोली यांच्या सोबत श्रीमती रतन संभाराव पोले, रास्तभाव दुकानदार, अहिल्यानगर, रा.औंढा, नागनाथ यांचे घरातील खोल्यांची पाहणी केली असता एका खोलीत ९२ कट्टे गहू आढळुन आले. तसेच त्यांच्या रास्तभाव दुकानाची पाहणी केली असता त्यामध्ये ५७ कट्टे गहू शिल्लक असल्याचे आढळून आले. दोन्ही जागेचा पंचनामा करण्यात येऊन जागेवर एकूण १४९ कट्टे गहू म्हणजेच ७४.५० क्विंटल गहू शिल्लक आढळून आला. पोलीस उपनिरिक्षक यांनी श्रीमती रतन

संभाराव पोले व त्यास पर्यायी व्यवस्था असलेले श्रीमती संगीता मुळे या दोन्ही दुकानाचे अभिलेखे जप्त केले व रास्तभाव दुकानदार यांचा मुलगा श्री.मारोतराव संभाराव पोले यांचेविरुध्द औंढा नागनाथ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सौ.रतन संभाराव पोले, रास्तभाव दुकानदार, औंढा नागनाथ, ता.औंढा यांच्या रास्त भाव दुकानाचा परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्या दि.२७.०६.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात येऊन १०० टक्के अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) येथील रासायनिक कारखाने दुषित पाणी उल्हास व वालधुनी नदीत सोडत असल्याबाबत

**(२७) * ९२३४५ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर (जि.ठाणे) येथील रासायनिक कारखाने, उल्हासनगरातील जीन्स कारखाने तसेच कांबा येथील ए.एस इंटरप्राईजेस यांचे रासायनिक दुषित पाणी योग्य प्रक्रिया न करता उल्हास व वालधुनी नदीत सोडले जात असल्याने उक्त नद्या व कल्याण खाडी प्रदूषित झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे, कल्याण-डोंबिवली शहरी भागांसाठी पाणी पुरवठा करणाऱ्या उल्हासनदीमध्ये जलपर्णीची वाढ झाली असून नदीपात्रात सांडपाणी सोडण्यात येत असल्याने पाणी प्रदूषित होत असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे याबाबत दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, मीरा भाईंदर, अंबरनाथ बदलापूर या शहरांमधील कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यासाठी काही उपाययोजना नाहीत तसेच कोटयवधी रूपये खर्च करून तयार करण्यात

येणाऱ्या भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण झाले नसल्यामुळे सांडपाणी नदीपात्रात मिसळत असल्याने संपूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये प्रदूषणात वाढ झाली आहे व त्यामुळे तेथील नागरिकांच्या व लहान मुलांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली व नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अशंत खरे आहे.

(२) हे खरे नसून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून याबाबत उल्हासनगर महानगरपालिकाकडे वेळोवळी पाठपूरावा करण्यात येत आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) व (५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नदी प्रदूषण रोखण्याच्या अनुषंगाने संबंधित दोषी उद्योग, सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, संबंधित महानगरपालिका व नगर पालिका यांच्यावर वेळोवेळी कायदेशीर कारवाई करण्यात आली असून संबंधितांवर न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच, मा. न्यायालयांच्या निर्देशानूसार उल्हास नदीमध्ये होणारे प्रदूषण रोखण्याकरिता मा. मुख्य सचिव, तसेच, विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठीत करण्यात आल्या असून या समित्यांमार्फत उल्हास नदीच्या प्रदूषणाबाबत वेळोवळी आढावा घेण्यात येत आहे.

-----------------

## मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यातील महाजल योजनेअंतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२८) * ८७८९२ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यात महाजल योजनेअंतर्गत कोटयवधी रुपयांची करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असून याबाबत वरिष्ठ

स्तरावरुन चौकशी करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबधित अधिकाऱ्यांकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, असल्यास, त्यानुसार संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत
आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे निर्देशानुसार, जिल्हाधिकारी यांनी मेहकर तालुक्यातील ५ गावातील पाणी पुरवठा योजनांची चौकशी करुन दि. २९/६/२०१७ रोजी विभागीय आयुक्त, अमरावती यांना अहवाल सादर केला आहे. चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार अंमलबजावणीमधील त्रुटीमुळे योजना अपुर्ण असल्याचे दिसून आले. यास्तव संबंधित यंत्रणाचे समन्वय तथा संनियंत्रण करुन प्रगती पथावरील योजना पुर्ण करण्याची मोहीम हाती घेण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह पुणे, कोल्हापूर, नाशिक, लातूर, औरंगाबाद विभागात केलेली नियमबाहय शिक्षक भरती

**(२९) * ८४९६५ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.चरण वाघमारे (तुमसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप**

**(जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह पुणे, कोल्हापूर, नाशिक, लातूर, औरंगाबाद विभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व खाजगी अनुदानित शाळांमध्ये राज्य शासनाची शिक्षक भरतीला बंदी असतानाही सन २०१६ पर्यंत ७ हजार २२८ शिक्षकांची नियमबाहय भरती करण्यात आली असून उक्त भरतीस ६२ शिक्षण अधिका-यांनी नियमबाहय मान्यता दिली असल्याचे तसेच या शिक्षकांच्या वेतनावर शासनाच्या तिजोरीतून ९७ कोटी रूपये खर्च झाले असल्याचे दिनाक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे अन्य शाळांत शंभर टक्के समायोजन झाल्याशिवाय खाजगी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर भरती करण्यात येवू नये याबाबतचा दिनांक २ मे, २०१२ रोजी तत्कालीन मुख्य सचिव यांनी आदेश काढला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांनी राज्यात बेकायदा शिक्षक भरती झाली असल्याचे मान्य करुन यास जबाबदार असलेल्या ६२ शिक्षण अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा पाठविल्या आहेत, ही खरे आहे काय,

(४) तसेच अमरावती विभागाचे तत्कालिन उप संचालक, रामधन पवार यांनी शासनाची परवानगी न घेता एका खाजगी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, व शिक्षणाधिकाऱ्यांवर नियमबाहय शिक्षक व विद्यार्थी भरती प्रकरणी गुन्हे दाखल का केले असा ठपका ठेवून त्यांना निलंबीत करण्यात

आल्यानंतर मॅटच्या नागपूर खंडपिठाने त्यांचे निलंबन नियमबाहय ठरवल्याचे व रामधन पवार यांनी आपली विभागीय चौकशी सुरु करावी, अशी दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) प्राप्त तक्रारीच्या आधारावर याप्रकरणी सखोल तपासणी सुरु आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सखोल तपासणी करिता सर्व संबंधिताना आयुक्त शिक्षण कार्यालयामार्फत ज्ञापनाव्दारे विचारणा करण्यात आली आहे.

(४) व (५) तत्कालीन उपसंचालक रामधन पवार यांनी केलेल्या विविध अनियमितते प्रकरणी त्यांना आयुक्त, शिक्षण यांच्या दि.०७.०८.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित केले. सदर निलंबन आदेशास मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, नागपूर यांच्या दि.३१.०८.२०१५ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली आहे. त्यांनी केलेल्या अनियमिततेप्रकरणी त्यांच्या विरुध्द दोषारोप बजावण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील रात्रशाळा बंद करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(३०) * ८५८१५ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रात्रशाळा बंद पाडणारा दिनांक १७ मे, २०१७ चा शासन निर्णय रदद करण्याच्या मागणीसाठी दिनांक १५ जून, २०१७ पासून शिक्षक भारती आणि महाराष्ट्र प्रदेश रात्र प्रशाला मुख्याध्यापक संघाच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १७६ रात्रशाळांमध्ये सुमारे ३० हजार विदयार्थी शिक्षण घेत असून या शाळांतील एक हजार १० शिक्षकांच्या सेवा समाप्त करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २२ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला असून या शाळांतील मुख्याध्यापक अतिरिक्त शिक्षकांना हजर करुन घेत नसल्याप्रकरणी शिक्षक संघटनांनी मा.शिक्षणमंत्री, उपसंचालक, शिक्षण विभाग यांचेकडे दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयामुळे दिवसभर कष्ट करणा-या होतकरु मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला असून या निर्णयाच्या विरोधात मा. मुख्यमंत्री यांना लोकप्रतिनिधींचे शिष्टमंडळ भेटले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने रात्र शाळांसंदर्भात जाहीर केलेल्या शासन निर्णयाला विरोध करित रात्र शाळांतील मुख्याध्यापकांनी शिक्षकांना सामावून न घेता दिनांक १५ जून, २०१७ रोजी शाळांबंद आंदोलन केले असून शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही शिक्षक लोकप्रतिनिधी यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) सदर शासन निर्णयान्वये दिवस शाळा व रात्रशाळा अशा दोन्ही ठिकाणी काम करणाऱ्या शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दुबार नोकरी करता येणार नाही, असा निर्णय घेतलेला आहे. याबाबत मा.उच्च न्यायालयाने शासनाने घेतलेली भूमिका योग्य असल्याचे दि.१६/०६/२०१७ च्या न्याय निर्णयात मान्य केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांनी शुल्क वाढ केली असल्याबाबत

**(३१) * ८६७६४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाशी संलग्नीतअनेक महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा नसताना ही १०० टक्के शुल्क वाढ केली असल्याचे माहे, एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाने निकाल वेळेत लागावेत यासाठी नवीन तंत्रज्ञान आणले असल्यामुळे खर्चही वाढल्याने तसेच पेपर तपासणीसाठी प्राध्यापकांचे मानधन वाढविल्यामुळे हा वाढलेला खर्च भागविण्यासाठी शुल्क वाढ केल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शुल्क वाढीमुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना भूर्दंड बसणार असल्याने उक्त निर्णयाविरोधात विद्यार्थी-शिक्षक संघटनानी विरोध दर्शविल्याची बाब दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

मुंबई विद्यापीठाने फक्त परिक्षा शुल्कात वाढ केलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

विद्यापीठामध्ये शिक्षकांकडून विविध परीक्षाविषयक कामे करुन घेतली जातात. ही कामे त्यांना त्यांची नियमित शिक्षणविषयक कामे करुन अतिरिक्तरित्या करावी लागतात. यासाठी त्यांना मानधन व येण्या-जाण्याच्या खर्चाची प्रतिपुर्ती केली जाते. गेल्या १६ वर्षात या नियमात सुधारणा करण्यात आलेली नाही. सर्व शिक्षक सवंर्गातून मानधन व प्रवास खर्च यामध्ये वाढ करण्याची मागणी वारंवार करण्यात येत असल्यामुळे यावर विचारविनिमय करण्यासाठी सर्व अधिष्ठात्यांची समिती नियुक्त करुन समितीच्या शिफारशीनुसार विविध प्राधिकरणांमध्ये तपशिलवार चर्चा होऊन सदर वाढ मान्य करण्यात आली आहे.

(३) नाही. अशी पत्रे विद्यापीठास प्राप्त झालेली नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील शालेय पोषण आहारामध्ये झालेला गैरव्यवहार

**(३२) * ८९४९४ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद नाशिक शिक्षण विभागातील शालेय पोषण आहार वितरण प्रणालीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काये आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये पुरवठेदारामार्फत कमी वजनाचा माल शाळांना पुरविण्यात येत असल्याच्या तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे निष्पन्न झाले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील मच्छी प्रक्रिया कंपनीतून होणारे प्रदूषण

**(३३) * ८८१९९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील एका खाजगी मरीन प्लांट क्र.जी.२ मधील मच्छी प्रक्रिया कंपनीत कोणतीही आधुनिक यंत्रणा नसल्याने सडलेल्या मच्छीपासून तेल बनविले जात असल्याने उक्त परिसरातील जवळपास २ कि.मी. अंतरापर्यंत दुर्गंधी पसरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीतून मोठ्या प्रमाणात धुर सोडला जात असल्याने वायु प्रदुषणाने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व असल्यास, त्यानुसार सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे नाही.

खालापूर (जि. रायगड) तालुका येथे मरीन प्लांट क्रमांक जी-२ मधील मच्छी प्रक्रिया कंपनी अस्तित्वात नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाने बालचित्रवाणी बंद करुन ई-बालभारती संस्था स्थापन करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(३४) * ८४८६९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने बालचित्रवाणी ही संस्था कायमची बंद करुन नव्याने ई-बालभारती स्थापन करण्याचा निर्णय दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इन्सेट उपग्रहाद्वारे प्रेक्षपित करण्यात येणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या निर्मितीकरिता राज्य शासनाने पुणे येथे दिनांक २७ जानेवारी, १९८४ रोजी स्थापन केलेल्या बालचित्रवाणी या संस्थेतील कर्मचाऱ्यांना आगाऊ एक महिन्याचे वेतन देवून दिनांक १ जून, २०१७ पासून सेवा मुक्त करण्याचा आदेश शालेय शिक्षण विभागाने काढला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्याने स्थापन केलेल्या ई-बालभारतीचा कार्यक्रम पूर्ण क्षमतेने चालावा याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) होय.
(३) ई-बालभारती ही संस्था स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

बालचित्रवाणी या संस्थेतील कार्यरत कर्मचाऱ्यांना औद्योगिक कलह कायदा, १९४७ नुसार एक महिन्याची आगावू नोटीस पे देऊन सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ३१ मे, २०१७ रोजी सेवामुक्त करण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माण (जि.सातारा) उत्तर भागात ११ गावांसाठी असलेली शिंगणापूर प्रादेशिक नळपाणी योजना सुरु करणेबाबत

**(३५) * ९२६६२ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण (जि.सातारा) उत्तर भागात ११ गावांसाठी असलेली शिंगणापूर प्रादेशिक नळपाणी योजना गत तीन वर्षापासून बंद झाली असल्याचे माहे मे,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नळपाणी योजना सुरळीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे आहे.

शिंगणापूर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना माहे जानेवारी २०१३ पासून बंद आहे.

(२) प्रादेशिक शिंगणापूर नळ पाणी पुरवठा योजना सुरु करणेकामी योजनेची दुरुस्ती करणे, विद्युत देयकांची थकबाकी व पावसाळा वगळता इतर टंचाई कालावधीत ९ महिने योजना चालविणेसाठी येणाऱ्या रु. ५३३.७१ लक्ष निधी शासनांमार्फत मिळणेकामीचा ठराव जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती जिल्हा परिषद सातारा सभा दि.०९/१०/२०१५ मध्ये पारीत करुन तसा अहवाल प्रथम शासनास सादर केलेला होता. शासनाने सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी सातारा यांचे मार्फत शासनास सादर करणेबाबत दिनांक १३/०१/२०१६ रोजी सूचना दिलेवरुन सदरचा प्रस्ताव दिनांक २५/०२/२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे सादर केलेला आहे.

सद्य:स्थितीत योजनेची वीज देयके थकबाकीची रक्कम रु.१,७८,२६,४१०/- इतकी असून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने विद्युत पुरवठा दिनांक ०२/१२/२०१३ रोजी तात्पुरत्या स्वरुपात व दिनांक ०१/०४/२०१४ रोजी कायम स्वरुपी खंडीत केलेला आहे.

योजनेचा उद्भव नीरा उजवा कालवा धर्मपुरी ता. माळशिरस, जि. सोलापुर येथे असून इतर उपांगे सातारा जिल्ह्यात असलेने महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीने सोलापूर व वडूज ता. खटाव, जि. सातारा येथील ठिकाणी न्यायलयात दावा दाखल केला असल्यामुळे सद्य:स्थितीत योजना न्यायप्रविष्ठ आहे.

दिनांक १६/०३/२०१६ रोजी शिंणापूर प्रादेशिक योजना पुनश्च सुरु करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद सातारा येथे योजनेतील समाविष्ठ शिंणापूर, मोही, खुटबाब, मार्डी, वावरहिरे, रांजणी, पळशी, राणंद, पर्यंती,कारखेल, डंगीरवाडी इ. गावांच्या सरपंच ग्रामसेवक तसेच गटविकास अधिकारी व उप अभियंता यांचे समवेत योजनेबाबत बैठक अयोजित केली असता फक्त शिंगणापूर, मोही, खुटबाब, मार्डी या चार गावाच्या ग्रामपंचायतीचे पदाधिकारी उपस्थित होते. व उपस्थित गावापैकी शिंगणापूर वगळता मोही, खुटबाब, मार्डी, या चार गावच्या ग्रामपंचातीने प्रादेशिक योजनेतून पाणी घेण्यास नकार देऊन प्रादेशिक शिंगणापूर योजनेमधून पाणी

घेण्यामध्ये स्वारस्य दाखविले नाही. सद्या मार्डी, मोही, पळशी, रांजणी, व पर्यंती, या गावांना टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. तसेच पेयजल संजीवनी योजनेतर्गत महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीची थकबाकी ५० टक्के पर्यंत भरणेची मानसिकता उपस्थित ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये दिसून आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील ३०९ ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याबाबत

**(३६) * ८९७३१ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात गत तीन महिन्यात तपासण्यात आलेल्या पाण्याच्या नमुन्यातील ३०९ ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणचे पाणी पिण्यास अयोग्य असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त भागात शुध्द पाण्याचा पुरवठा करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

कोल्हापुर जिल्हयातील एकूण १२ तालुक्यांपैकी ४२९९ पिण्याच्या पाण्याचे नमुने माहे फेब्रुवारी ते मे २०१७ या कालावधीत अणुजैविक तपासणीसाठी घेण्यात आले होते. त्यापैकी प्रथम तपासणीत एकूण ३३० नमुने दुषित आढळले होते.

(२) पिण्याच्या पाण्याचे क्लोरीनेशन योग्यरित्या न झालेने जैविकदृष्ट्या पिण्यास  अयोग्य आले आहेत.

(३) दुषित आढळलेल्या पाण्याच्या नमुन्यांबाबत संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा आरोग्य अधिकारी, सर्व संबंधित तालुका आरोग्य अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी यांना तात्काळ ई-मेलद्वारे  भूजल सर्वेक्षण विभागामार्फत योग्य ती उपाययोजना करणेबाबत कळविण्यात आले.

त्यानुसार संबंधित ग्रामपंचायतींनी दुषित आढळलेल्या पाणी नमुन्यांच्या स्त्रोतांचे शुध्दीकरण करुन घेतले. त्यानंतर सदर स्त्रोतांतील पिण्याच्या पाण्याचे नमुने पुन्हा प्रयोग शाळांकडून पुर्नतपासणी करुन घेतली असता  ते सर्व पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे.

(४) सदर बाबतीत विलंब झाला नाही.

-----------------

## पालसई (ता. वाडा जि. पालघर) येथील कळंभई, आसनस, पालसई व बोरांडे येथील अपूर्ण नळपाणी योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३७) * ९४३७४ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालसई (ता.वाडा जि.पालघर) ग्रामपंचायत येथील कळंभई, आसनस, पालसई व बोरांडे येथील अपूर्ण नळपाणी योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबतची चौकशी करण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांच्याकडे दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात  उप मुख्य कार्यकारी अधिकारी,पाणी व स्वच्छता विभाग, जि.प. पालघर यांनी  गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा जि. पालघर यांच्याकडे दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास अनेकवेळा पत्रव्यवहार करुनही त्यावर गटविकास अधिकारी यांनी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा यांच्यावर तातडीने कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी पंचायत समिती स्तरावर घेण्यात आलेल्या सुनावणीस सर्वानूमते झालेल्या निर्णयानूसार भारतीय प्रौद्योगीकी संस्थान (I.I.T.) मुंबई या त्रयस्थ यंत्रणे मार्फत सदर योजनांची चौकशी व तपासणी सुरु आहे.
(३) सदर योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि. ठाणे) तसेच मुंबई व नाशिक या नागरी परिक्षेत्रात अनधिकृत प्राथमिक शाळा सुरु असल्याबाबत

**(३८) * ९००५० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषकरून राज्य शिक्षण परिषदेने शिफारस केलेल्या कल्याण (जि. ठाणे) तसेच मुंबई व नाशिक या प्रामुख्याने शिक्षण उपसंचालक नागरी परिक्षेत्रात प्राथमिक अनधिकृत शाळांची उभारणी झाल्याने पालकांचे होत असलेले आर्थिक शोषण थांबविण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी, जनप्रतिनिधी, शिक्षणप्रेमी, विद्यार्थी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा. मंत्री (शालेय शिक्षण), मा. राज्यमंत्री(शालेय शिक्षण), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), मुख्य-सचिव तसेच संबंधित विभागाचे प्रधान सचिव तथा शिक्षण

संचालक आणि त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्या दिनांक १८ जून, २०१७ वा त्यासुमारास निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अनधिकृत शाळा असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु या शाळांमध्ये आर्थिक शोषण होत असल्याबाबत तक्रार प्राप्त नाही.
(२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दि. ३ डिसेंबर, २०१२ या अधिसुचनेनुसार अनधिकृत शाळेवर कारवाई करण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांना प्राधिकृत केले आहे. अनधिकृत शाळेत प्रवेश घेऊ नये यासाठी अनधिकृत शाळांची यादी वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून अनधिकृत शाळेवर तात्काळ कारवाई करण्याचे निदेश सर्व शिक्षण निरीक्षक/ शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहेत. अशा अनधिकृत शाळा बंद झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे नजिकच्या मान्यताप्राप्त शाळेत समायोजन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कासेगांव, भाळवणी, खर्डी (ता.पंढरपूर,जि.सोलापूर) या बंद असलेल्या तीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणेबाबत

**(३९) * ९३२०५ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कासेगांव, भाळवणी, खर्डी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या तीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खर्डी योजनेतील उबंरगाव येथील पाणी शुध्दीकरण केंद्राची दुरावस्था झाली असून येथील विद्युत मोटारी, रोहित्र इ.साहित्य गहाळ झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त तीनही योजनांच्या त्रुटी दूर करुन कार्यान्वित करण्याबाबत व सदर पाणीशुध्दीकरण केंद्राची दुरुस्ती करुन तेथे सुरक्षारक्षक नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) होय. हे खरे आहे.

खर्डी प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतील उंबरगांव येथील जलशुध्दी केंद्रामध्ये चोरी झालेल्या साहित्याबाबत दिनांक ७/१०/२०१५ रोजी पंढरपूर पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली आहे.

योजनेतील ट्रान्सफॉर्मर मधील कॉईल व ऑईल चोरीला गेलेमुळे ट्रान्सफार्मर दुरुस्तीचे अंदाजपत्रकास मान्यता दिली असून ई- निवीदा प्रक्रिया सुरु केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठामार्फत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्रास निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(४०) * ९२०५७ श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातर्फे गतवर्षी जाहीर करण्यात आलेल्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्राचे काम निधी अभावी प्रलंबित असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाकडून अपेक्षित असलेल्या चार कोटींच्या निधीपैकी केवळ एक कोटीचा निधी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अध्यासन केंद्राच्या उभारण्यासाठी आवश्यक असलेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी रु.५.०० कोटी इतका निधी मुंबई विद्यापीठास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनामार्फत घोषणा करण्यात आली होती. त्याअनुषंगाने पहिल्या टप्प्यात मुंबई विद्यापीठास रु.१.०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे अध्यासनासंदर्भात मुंबई विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल विद्यापीठाकडून वारंवार मागवूनही शासनास अद्याप अप्राप्त आहे. सदर अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर, पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्हयातील पाणी पुरवठा योजनांचा मुख्यमंत्री पेयजल योजनेमध्ये समावेश करण्याबाबत

**(४१) * ९२०६३ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील लासून व ८ गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, वढोदा व ६ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, चहार्डी पाणी पुरवठा योजना, धानोरा पाणी पुरवठा योजना आणि गोरगावले बु. पाणी पुरवठा योजना या योजनांचा मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा क्र.२ अंतर्गत समावेश

करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी तसेच दिनांक २० मे, २०१७ रोजी मा.पाणी पुरवठा मंत्री यांच्याकडे तसेच दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांचेकडे पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंमळनेर (जि.जळगांव) तालुक्यामध्ये सर्वाधिक १७ गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झाल्याने अंमळनेर मतदार संघातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस खास बाब म्हणून मुख्यमंत्री निधी अंतर्गत प्राधान्याने मंजूरी मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, अंमळनेर यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १० मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त मागणी संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. मा. लोकप्रतिनिधींची दिनांक ०५.०५.२०१६, दिनांक ०७.०६.२०१६, दिनांक ०५.०७.२०१६ दिनांक ०४.०३.२०१७ व दिनांक २४.०५.२०१७ ची पत्रे शासनास प्राप्त झाली आहेत.

(२) होय.

(३) सदर पत्रांन्वये केलेल्या विनंतीबाबत चौकशी करण्यात येत आहे. चौकशीअंती सदर गावे निकषांत बसत असल्याचे आढळून आल्यास त्यांचा समावेश प्रस्तावित मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम टप्पा-२ मध्ये करता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप दुकानातील गहू व रॉकेलचा होत असलेला काळाबाजार

**(४२) * ८५९९१ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील एका शिधावाटप दुकानातील गहू व रॉकेलचा काळाबाजार करणा-या दोघांना पोलिसांनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, प्रश्नोक्त शिधावाटप दुकानाचे परवाना रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) अंबरनाथ येथील शिधावाटप अधिकारी, सहायक शिधावाटप अधिकारी व शिधावाटप निरिक्षक, फिरत्या पथकातील निरिक्षकांनी संयुक्तपणे दिनांक ३.०६.२०१७ रोजी अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक ४६ फ ६८ ची संपूर्ण तपासणी केली. सदर तपासणीत गंभीर दोष आढळून आल्याने दुकानदाराविरुध्द अंबरनाथ पोलिस ठाणे, येथे दिनांक ३.०६.२०१७ रोजी जीवनावश्यक वस्तु कायद्यानुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपनियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ यांनी दिनांक १३.०६.२०१७ च्या आदेशान्वये सदर दुकानाचे प्राधिकारपत्र निलंबित केले. तथापि, सदर आदेशास दि.१६.६.२०१७ च्या शासन आदेशान्वये स्थगिती देण्यात आली असून सद्य:स्थितीत सुनावणीअंती होणाऱ्या आदेशाच्या अधिन राहून दुकान सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आसनगांव (पूर्व) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेबाबत

**(४३) * ८८९७१ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसनगांव (पूर्व) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे मोठ्या प्रमाणात लोकवस्ती वाढली असल्याने या परिसरातील गावांमधील नागरिकांसाठी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुरु करण्यात यावी याबाबतचा प्रस्ताव आसनगांव ग्रामपंचायतीने ठाणे जिल्हा परिषदेमार्फत माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रादेशिक पाणीपुरवठा योजना प्रस्तावास शासनाने गतवर्षी मान्यता देऊन त्यासाठी १५ लक्ष रुपये निधी ग्रामपंचायतीस उपलब्ध करुनही प्रस्तुत योजनेचे काम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आले नसल्याचे दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन निधी प्राप्त होऊनही उक्त योजनेचे काम सुरु न होण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह प्रादेशिक पाणीपुरवठा योजना तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

आसनगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून शासनास प्राप्त झाला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये करण्यात आलेल्या स्वीय सहायक पदाच्या भरतीबाबत

**(४४) * ९०४१९ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये स्वीय सहाय्यक हे पद सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिरातीस अनुसरुन अनेक बेरोजगार उमेदवारांनी अर्ज भरले, पात्र उमेदवारांची लेखीपरिक्षा, कौशल्य चाचणी परिक्षा घेण्यात आली व मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असतांना अचानकपणे सदर पदे सरळसेवेने न भरता पदोन्नतीने भरण्यात आले असून याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी उमेदवारांनी कुलसचिव, विद्यापीठ नांदेड व मा.उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बेराजेगारांची फसवणूक करुन सरळसेवेची पदे पदोन्नतीने भरणा-या संबंधित दोषी अधिका-यांवर शासनाने काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. सदर पदासाठी एकूण ४ उमेदवारांकडून आवेदन पत्र प्राप्त झाले होते. त्यापैकी २ अर्जदार पात्र झाले. या पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा विद्यापीठाने घेतली. तथापि, सदर पदासाठी लघुलेखन चाचणी, टंकलेखन चाचणी, मुलाखत आदी प्रक्रिया बाकी होत्या. तद्नंतर विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार विद्यापीठाने शासन राजपत्र दि. २४.०६.१९९७ मधील तरतुदीनुसार सदर पद पदोन्नतीने भरले आहे. याबाबत मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) प्रकरणी शासनाच्या दि.१६.०२.२०१७ च्या पत्राच्या अनुषंगाने विद्यापीठाकडून दि.२८.०२.२०१७ अन्वये शासनास अहवाल प्राप्त झाला. सदर अहवालाच्या अनुषंगाने संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून काही मुद्द्यांची माहिती प्राप्त करुन घेण्यात आली असून प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरात निकृष्ट अन्न पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(४५) * ८५९३७ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील वेगवेगळया भागात २३ खाद्यपदार्थाच्या दुकानांतून निकृष्ट अन्न पदार्थांची विक्री होत असल्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या तपासणीमधून दिनांक १४ जून,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चायनिज रेस्टॉरंट, हॉटेल्स, चायनिज गाडया व फळांच्या हातगाडयांचा यामध्ये समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) ठाणे शहरातील वेगवेगळ्या भागात सदोष अन्न पदार्थांची विक्री करणा-या चायनीज हॉटेल्स, गाड्यासह विविध २३ आस्थापनावर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केल्याबाबतची बातमी दि. १४/०६/२०१७ रोजीच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

(३) अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आलेल्या तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने १७ अन्न आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत, २ आस्थापनांना ठाणे महानगरपालिकेने

त्यांच्या नियमानुसार सील केलेले आहे, १ आस्थापना महानगरपालिकेने रस्ता रुंदीकरणामध्ये तोडली आहे, १ आस्थापनाविरूध्द न्यायनिर्णय प्रकरण दाखल करण्यात आले आहे. ०२ आस्थापनांनी तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींची पुर्तता केल्याने त्यांचेविरूध्द कारवाई करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चाफेड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावठाण भागातील पाणी टंचाईबाबत

**(४६) * ८७२५० श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाफेड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) गावठाण भागातील राणेवाडी, बौध्दवाडी, घाडीवाडी व मोंडकरवाडी येथील ग्रामस्थांना मागील १० वर्षापासून पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई भासत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू चाफेड-गावठाण येथे राष्ट्रीय पेयजल योजनेंतर्गत असलेल्या शासकीय विहिरीच्या पाण्याची पातळी माहे जानेवारी महिन्यापासूनच अत्यंत कमी झाली असून दुसरे पाण्याचे कोणतेही स्त्रोत नसल्याने तेथील ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावातील पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सुटत नाही तोपर्यंत येथे टँकर द्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा अशी मागणी सरपंच, चाफेड यांनी तहसिलदार देवगड, गटविकास अधिकारी,पंचायत समिती, देवगड, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, देवगडचे कनिष्ठ अभियंता आदीकडे माहे एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने चाफेड-गावठाण येथे कायम स्वरूपी पाणी पुरवठा होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सदर ठिकाणी गेल्या १० वर्षापासून पाणी टंचाई नसून या वर्षीच्या उन्हाळयामध्ये पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.

(२) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या विहीरीच्या पाण्याची पातळी माहे एप्रिल-मे, २०१७ मध्ये कमी झाली होती.

(३) व (४) हे खरे आहे.

सरपंच, चाफेड यांनी केलेल्या मागणीनुसार घाडीवाडी, राणेवाडी, मोंडकरवाडी, व बौध्दवाडी यांना दि. ०८ मे, २०१७ ते दि. ०९ जून २०१७ पर्यंत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणेत आला आहे.

तसेच चाफेड गावठाणातील उक्त वाडयांना पाणी पुरवठयाची कायमस्वरुपी सोय करणेसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१७-१८ च्या आराखडयात नवीन नळ पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजा गोडखैरी (ता.कळमेश्वर जि.नागपूर) या गावात पाणी पुरवठा योजनेकरीता निधी मिळण्याबाबत

**(४७) * ९१४९१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा गोडखैरी (ता.कळमेश्वर, जि.नागपूर) या गावात भीषण पाण्याची टंचाई निर्माण होत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री, नागपूर तथा मा. ऊर्जा मंत्री आणि जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे दिलेल्या निवेदनानुसार गोडखैरी पाणी पुरवठा योजनेचा १ कोटी ९९ लक्ष ८९ हजार ४४१ रूपयांच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद,नागपूर यांनी मा.पालकमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास सदर योजनेकरीता जिल्हा नियोजन समितीच्या राज्याच्या हिश्श्यातून खर्च करण्याची परवानगी देऊन त्या प्रमाणे निधी मिळण्याबाबत प्रस्ताव सादर केला असता अद्यापही निधी प्राप्त झाला नसल्याचे दिनांक २० जून २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर योजनेस निधी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजनेच्या रु. १ कोटी ८९ लक्ष १४ हजार १५९ इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास दि. ३०/६/२०१७ रोजी तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाअंतर्गत जिल्हयाच्या मागील वर्षाचा अखर्चित निधी रु. ५४७.९६ लक्ष व या वर्षीच्या सन २०१७-१८ अंतर्गत जिल्हा नियोजन समिती मार्फत रु.१२२४.६९ लक्ष इतका नियतव्यय (सर्वसाधारण योजना) मंजूर करण्यात आला आहे. असा एकूण रु.१७७२.६५ लक्ष मंजूर नियतव्यय सन २०१७-१८ करिता उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोफण (ता.रोहे,जि.रायगड) गावामध्ये व रोहे तालुक्यात होत असलेल्या अन्नधान्य गैरव्यवहाराबाबत

**(४८) * ९४२८३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोफण (ता.रोहे, जि.रायगड) गावात असणा-या रास्त भाव धान्य दुकानात झालेल्या गैरव्यवहाराची माहिती उघडकीस आली असून दर दोन महिन्यांमध्ये उक्त तालुक्यातील अन्नधान्याचा होणारा गैरव्यवहार निदर्शनास येत असल्याची माहिती माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गैरव्यवहारामुळे लाभार्थींना हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहवे लागत असल्याने याबाबत अनेक तक्रारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गैरव्यवहारामुळे लाभार्थ्यांना हक्काच्या अन्नधान्यापासून वंचित राहावे लागत असल्याबाबतच्या तक्रारी जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) पुरवठा निरीक्षक अधिकारी, रोहा यांनी सदर प्रकरणी चौकशी केली असून रास्तभाव धान्य दुकान गोफण, ता.रोहा या दुकानात दोष आढळून आल्याने दि.१९.७.२०१७ व दि.२८.७.२०१७ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीच्यावेळी रास्तभाव दुकानदार यांनी अभिलेख सादर न केल्यामुळे अंतिम सुनावणी दि.९.८.२०१७ रोजी ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहर व जिल्हयात भेसळयुक्त दुधाचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(४९) * ८४९०४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व जिल्हयामध्ये भेसळयुक्त दुधाचे प्रमाण वाढले असून नागरिकांपर्यंत वितरीत होणाऱ्या दुधामध्ये डिटर्जंट पावडर, युरिया, स्किम्ड दुध पावडर, कॉस्टिक सोडा, ग्लुकोज, रंग, तेल, स्टार्च सारखे घातक घटक समाविष्ट असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्हयासह मुंबई शहरात अशाप्रकारे भेसळयुक्त दुधाचा पुरवठा व विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व दूधामध्ये भेसळ करणारे व भेसळयुक्त दूधाची विक्री करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आजनगाव (ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती) येथील स्वच्छ भारत मिशन अभियानाअंर्तगत शौचालय बांधकामाच्या अनुदानामध्ये झालेला गैरव्यवहार

**(५०) * ९४३४४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजनगाव (ता.धामणगाव रेल्वे,जि.अमरावती) येथील सरपंच व सचिव यांनी स्वच्छ भारत मिशनच्या अभियानाअंर्तगत शौचालय बांधकामाच्या अनुदानामध्ये गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक ७ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी अनुदान प्राप्त लाभार्थींच्या यादीत अनेक नावे दोन वेळा आल्याचे तसेच एका कुटुंबात मंजुर केलेल्या तीन शौचालयांपैकी दोन शौचालय बांधले असुन एका शौचालयाचे बांधकाम न करता अनुदान घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) या अनुषंगाने ग्रामपंचायत सदस्य व मा.विधानसभा सदस्य यांच्याकडून तक्रार प्राप्त झालेली आहे.
(२) हे खरे नाही.
पायाभूत सर्वेक्षण करताना, संकेतस्थळावर एकच नाव दोनवेळा असणे, चुकीची अद्याक्षरे असलेले एक नाव दोन वेळा असणे, अशी माहिती भरण्यात आली आहे. तथापि, प्रोत्साहन रक्कम एकाच लाभार्थ्याला देण्यात आली आहे. एकाच घरातील वेगवेगळे राहत असलेल्या कुटुंबांनी बांधकाम केलेल्या शौचालयास प्रोत्साहन अनुदान देण्यात आले आहे.
(३) ग्रामपंचायत सदस्य व मा. विधानसभा सदस्य यांच्याकडून प्राप्त तक्रारीची चौकशी केली असता, ४२ लाभार्थ्यांना प्रोत्साहन रक्कम रोखीने देणे, प्रोत्साहन अनुदान मागणी प्रस्तावासोबत लाभार्थ्यांऐवजी अन्य इसमाचे छायाचित्र जोडणे, तक्रारदार यांना वैयक्तिक शौचालयाचा लाभ घेतलेल्या कुटुंबांची चुकीची यादी पुरविणे, अशा प्रकारच्या अनियमितता संबधित ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांच्याकडून घडल्याचे निदर्शनास आले आहे. घडलेल्या कार्यालयीन अनियमिततेपायी संबधित ग्रामपंचायत सचिव यांना दिनांक १४/०६/२०१७ च्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले

होते. चौकशीअंती त्यांना ताकिद देण्यात आली आहे. या प्रकरणी पुन्हा नव्याने फेरचौकशी करण्यात येत आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबधितावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) येथील कंपन्या समुद्रात रासायनिक सांडपाणी सोडत असल्याबाबत

**(५१) * ८६५६१ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक वसाहतीतील कारखानदारांनी प्लॉट न.ई भागातील नाल्यात पाऊस सुरु होताच रात्रीच्यावेळी रासायनिक सांडपाणी सोडल्याची बाब दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय.

(२) तसेच तारापूर (जि.पालघर) येथील बडया कंपन्या रात्रीच्या वेळी सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता समुद्रात सांडपाणी सोडत असल्याने सदर कंपन्यांना प्रदुषण मंडळाने उत्पादने बंद करण्याच्या नोटीसा माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तारापूर (जि.पालघर) येथील सहा कारखान्यातून प्रदुषित व प्रक्रिया न केलेले सांडपाणी समुद्रात सोडले जात असल्याबाबतच्या तक्रारी अखिल भारतीय मांगेला समाजाने राष्ट्रीय हरित लवादाकडे केलेल्या उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबधित उद्योगांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित रासायनिक कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच पर्यावरण विभागाने कारवाई केलेल्या कंपन्यांची नावे काय आहेत व सद्यःस्थितीत किती कंपन्या बंद केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहे एप्रिल व मे, २०१७ मध्ये १४ उद्योगांवर कारवाई केलेली आहे.

(३) तारापूर (जि. पालघर) औद्योगिक वसाहतीच्या सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेतून क्षमतेपेक्षा जास्त सांडपाणी समुद्रात सोडले जात असल्याबाबत आखिल भारतीय मांगेला समाज व इतर यांनी मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्याकडे याचिका क्र. ६४/२०१६ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) व (५) महाराष्ट्र प्रदूषण निंयत्रण मंडळामार्फत माहे एप्रिल, २०१७ दरम्यान रात्रीच्यावेळी ई झोन तारापूर औद्योगिक वसाहतीतील उदयोगांची आकस्मिक पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या मे.सिक्वेंट सायंटिफिक लि., मे.फार्मास्युटिकल प्रॉडक्टस प्रा.लि., मे.युनियन पार्क, मे.रामदेव केमिकल्स, मे.कॅमलिन फाईन सायन्सेस लि., मे.आरती ड्रग्ज., मे.सॅरेक्स ओव्हरसिज लि. या कंपन्यांना उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले होते. तर, मे.आशिष एन्टरमिडीएट, या कंपनीस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

तसेच, माहे मे, २०१७ दरम्यान रात्रीच्यावेळी ई झोन तारापूर औद्योगिक वसाहतीतील उदयोगांची आकस्मिक पाहणी दरम्यान दोषी आढळलेल्या मे.मंधाना डाईंग., मे.लेविनो कपूर कॉटन लि., मे.ई लँड इंडिया या कंपन्यांना उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले होते. तर, मे.सिव्हेस्टर टेक्स्टाईल लि., मे.डी.सी.टेक्स्टाईल लि., मे.सियाराम सिल्क मिल्स् लि. या कंपनीस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

सद्य:स्थितीत या सर्व उद्योगांनी जल व हवा प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या केलेल्या उपाययोजना व सादरीकरणाच्या अनुषंगाने,

उद्योगांना योग्य त्या अटी व शर्ती घालून व बँक हमी घेऊन उत्पादन पूर्ववत चालू ठेवण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत देण्यात आले आहेत.

जुलै, २०१७ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तारापूर औद्योगिक वसाहतीतील मे. नीपूर केमिकल्स लि., मे. सारेक्स ओव्हरसिज, मे. सिल्वेस्टर टेक्सटाईलस प्रा. लि. व मे. निर्भय रसायन लि. या कंपन्याना उत्पादन बंदचे आदेश दिले असून मे. पायोनिअर इंडस्ट्रीज लि. कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या एलआयसी विमा रकमेत झालेला गैरव्यवहार

**(५२) * ८८३७२ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या एलआयसी विमा रकमेत लाखोचा गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००९ ते २०१२ या कालावधीत कांही शिक्षकांच्या पगारातून कपात केलेली रक्कम त्यांच्या विमा खात्यात जमा झाली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहारा प्रकरणी प्राथमिक शिक्षक भारती संघटनेच्या पदाधिका-यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहारा प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

माहे जाने, २०११ ते मे, २०१२ या कालावधीतील काही शिक्षकांच्या पगारातून कपात करण्यात आलेली विमा रक्कम एल.आय.सी.कडे भरताना अनियमितता झालेली आहे. त्यामुळे शिक्षकांच्या वेतनातून कपात केलेली रक्कम त्यांच्या विमा खात्यात जमा झालेली नाही. मात्र ती एल.आय.सी.कडे जमा करण्यात आली आहे.

(३) होय.

(४) प्रस्तुत प्रकरणी गटशिक्षणाधिकारी, दोडामार्ग यांचे अहवालानुसार कार्यालयात एकच कर्मचारी कार्यरत असल्याने व कामाचा व्याप अधिक असल्यामुळे एल.आय.सी. शेडयुल जुळविण्यामध्ये सदरची अनियमितता झालेली आहे.

सदर कार्यालयात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून शिक्षकांच्या वेतनातून कपात झालेल्या विमा रक्कमेचे शेडयुल जुळविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरगव्हाण (ता.चोपडा जि.जळगाव) येथे दुषित पाणीपुरवठयामुळे अतिसाराची लागण झाली असल्याबाबत

**(५३)** * **९१०१० श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरगव्हाण (ता.चोपडा जि.जळगाव) येथे दुषित पाणीपुरवठयामुळे २०० हून अधिक जणांना अतिसाराची लागण झाली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तदनुसार उक्त ठिकाणी शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, अंशत: खरे आहे.

वरगव्हाण, ता.चोपडा, जि.जळगांव येथे दुषित पाणी पुरवठ्यामुळे साथरोग विभागाच्या अहवालानुसार ११० रुग्ण अतिसाराचे आढळून आलेले आहेत.

(२) होय.

ज्या दिवशी लागण झाली त्याच दिवशी प्रत्यक्ष गावास भेट देऊन साथरोग विभागामार्फत साथरोग पथक उपचारासाठी कार्यरत ठेवून रुग्णांवर उपचार करण्यात आलेले आहेत. तसेच साथ उद्रेकाच्या कारणाचा शोध घेण्यात आला त्यानुसार ३ व्हॉल्व गळती आढळून आलेली असून तात्काळ दुरुस्ती करण्यात येऊन पाण्याच्या टाकीत सुपर क्लोरिनेशन करुन पाणी शुध्द करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदखुर्द (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील पाणीपुरवठा योजनेत ग्रामपंचायत स्तरावरील स्थानिक समितीची परवानगी नसतांना देयके अदा करण्यात आल्याबाबत

**(५४) * ८९२८७ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदखुर्द (ता.एरंडोल,जि.जळगांव) येथील पाणीपुरवठा योजनेत ग्रामपंचायत स्तरावरील स्थानिक समितीची परवानगी नसतांना तसेच स्थानिकांच्या सदर योजनेच्या कामाबाबत तक्रारी असतांना जमा झालेला निधी संगनमताने काढून देयके अदा करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना अपूर्ण असल्यामुळे ग्रामपंचायतीने ताब्यात घेण्यास नकार दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

(२) होय.

योजना प्रगतीपथावर असल्याने ग्रामपंचायतीला हस्तांतरीत झालेली नाही.

(३) होय.

नांदखुर्द खु योजनेसाठी रु.३०.५३ लक्ष निधी समितीस अदा केलेला आहे. चौकशीनुसार झालेल्या कामाचे मुल्यांकन रु. २३.१६ लक्ष दिसून येते. तसेच नांदखुर्द बु. योजनेसाठी ३५.५१ लक्ष निधी समितीस अदा केलेला असून, झालेल्या कामाचे मुल्यांकन रु. २६.७३ लक्ष दिसून येते. त्यानुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अध्यक्ष/सचिव यांना अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उदगांव (जि. कोल्हापूर) जवळ कृष्णा नदीच्या पात्रात रासायनिक पाणी सोडल्याने मासे मृत्यूमुखी पडल्याबाबत

**(५५) * ८९२३८ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगांव (जि. कोल्हापूर) जवळ कृष्णा नदीच्या पात्रात रासायनिक पाणी सोडल्याने लाखो मासे व जलचर मृत्यूमुखी पडल्याची घटना दोन ते तीन वेळा घडूनही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कोणतीच कारवाई केली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिकांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी केल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम** : (१) व (२) उदगांव (जि. कोल्हापूर) जवळ कृष्णा नदीच्या पात्रात मासे मृत झाल्याचे वृत्त दिनांक १३/०४/२०१७ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. तसेच दिनांक १४/०४/२०१७ रोजी स्थानिकांकडून दुरध्वनीद्वारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास तक्रार प्राप्त झाली होती हे खरे आहे.

(३) उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक १४/०४/२०१७ रोजी स्थळपाहणी करण्यात आली. स्थळपाहणीच्या अनुषंगाने आढळून आलेल्या बाबींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

• पहाणीच्या दरम्यान प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष औदयोगिक सांडपाणी नदीत मिसळत नव्हते. तथापि, सांगली-मिरज-कुपवाड मनपा क्षेत्रातून निर्मित घरगुती सांडपाणी नाल्यामार्फत मौजे उदगावच्या वरील बाजूस (Upstream) अंदाजे ९ ते १० किमी अंतरावर कृष्णा नदीमध्ये मिसळते ही वस्तुस्थिती आहे.

• पाहणी दरम्यान आढळून आलेल्या मृत माश्यांचे न्यायवैधक प्रयोगशाळेमार्फत पृथ:करण करण्यात आले. सदर पृथ:करण अहवालावरून मृत माश्यामध्ये कोणत्याही प्रकारचे रासायनिक घटक आढळून आले नसल्याबाबत कळविले आहे.

• सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिका यांच्याविरुध्द घरगुती सांडपाणी विनाप्रक्रिया कृष्णा नदीत वेगवेगळया नाल्याद्वारे सोडत असल्यामुळे जिल्हा न्यायालय, सांगली येथे खटला क्र. १२३/२०१५ अन्वये दिनांक ०३/०३/२०१५ रोजी दाखल केलेला असून सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली (जि.हिंगोली) शहरातील गारमाळ भागातील रॉकेल वितरकाचे रॉकेल परवाना रद्द करण्याबाबत

**(५६) * ९२५१३ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली (जि.हिंगोली) शहरातील गारमाळ भागामध्ये दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास फरार रॉकेल माफियाला अटक करण्यात आल्यामुळे त्याचा रॉकेल परवाना रद्द करण्याबाबत नागरिकांनी तक्रार दाखल केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणातील मुख्य आरोपीकडे रॉकेल विक्रीचा परवाना नसताना त्याच्याकडे तीन लाख रुपये किंमतीचा रॉकेलचा साठा असूनही पुरवठा विभाग व पोलीसांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे तसेच दोषी रॉकेल विक्रेत्याचा रॉकेल परवाना रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२), (३) व (४) हिंगोली जिल्ह्यातील मौजे गारमाळ येथे पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन हिंगोली (शहर) यांनी दि.२९.३.२०१७ रोजी छापा मारला असता चंदू भिकारी प्यारेवाले या व्यक्तीने विनापरवाना बेकायदेशीररित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ४८८५ लिटर केरोसिनचा साठा केल्याचे आढळून आले. सदर साठा जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुध्द पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन हिंगोली (शहर) यांनी जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अन्वये पोलीस स्टेशन, हिंगोली (शहर) येथे गु.र.नं.१४०/२०१७ दाखल केला आहे.

-----------------

## मौजे धाड (जि. बुलडाणा) व परिसरातील गावांना अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याबाबत

**(५७) * ८६३०४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धाड (जि.बुलडाणा) व परिसरातील ४५ गावांना पाणी शुध्दीकरण करण्याची कोणतीही यंत्रणा कार्यान्वित नसल्याने अशुध्द पाणी पुरवठा होत असल्याचे दिनांक २८ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाड व परिसरात पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी कालबाह्य झाली असून पाईप गंजले आहेत व पाणी शुध्दीकरणासाठी केवळ ब्लिचिंग पावडरचा उपयोग केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणी शुध्द पाणी पुरवठा करणे बाबत व पाणी शुध्दीकरणाची यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे धाड (जि. बुलडाणा) येथील पाईपलाईन लिकेज होऊन अशुद्ध पाणी पुरवठा होत असल्याचे दिनांक २८ जून, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत असल्याचे तसेच गावामध्ये १०८ व्यक्तींना अतिसाराची लागण झाल्याचे निदर्शनास आल्याने, ग्रामपंचायत, धाड यांनी फुटलेली पाईपलाईन तातडीने दुरुस्त केली आहे. तसेच घरगुती पाणी शुद्धिकरणासाठी ब्लिचिंग पावडरचे वाटप तसेच रुग्ण उपचार, नियमित पाणी शुद्धीकरण करुन साथ आटोक्यात आणणे इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या आवश्यक कामांचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) येथील ६९ गावांना पाणीपुरवठा करणेबाबत

**(५८) * ८९८४१ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) येथील ६९ गावांच्या पाणीपुरवठा योजनेतील जलवाहिनी विनावापर पडून आहेत तसेच उक्त गावांमध्ये अद्यापपर्यन्त पाणी पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना सन २००८ पासून ते सन २०१०पर्यंत पूर्ण करण्याचा कार्यादेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दिलेले असताना उक्त पाणी पुरवठा नियोजित कालावधीमध्ये सुरु झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त गावांना कायमस्वरूपी पाणी पुरवठा सुरु होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

योजनेतील ६९ गावांना वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्तित्वातील योजनेतून विविध ठिकाणी नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत ६९ गावांपैकी ५२ गावे ही वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट असून त्यापैकी १० गावांना महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा सुरु आहे. उर्वरित गावांना महानगरपालिकेची प्रगतीपथावर असलेली नगरोत्थान अभियाना अंतर्गत वाढीव १०० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना (टप्पा-३) पूर्ण झाल्यावर उपलब्ध होणार आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेच्या कामास तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली. मंजूर वाढीव मुदतीत माहे डिसेंबर २०१४ पर्यंत योजनेची कामे ९८% पूर्ण झाली आहेत. तथापि महानगरपालिकेमार्फत पाणी तुटवडयामुळे सर्व गावांना नळजोडणीद्वारे पाणी उपलब्ध झाले नसल्याने योजना पूर्ण होऊ शकली नाही.

(३) आजमितीस योजनेचे ९८% काम पूर्ण झाले आहे. शासन निर्णयानुसार योजनेतील सर्व गावांना पाणी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी वसई-विरार शहर महानगरपालिकेची आहे. परंतू महानगरपालिकेने सर्व गावांना नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा विहित वेळेत न दिल्याने योजना १००% पूर्ण होऊ शकली नाही. सद्यस्थितीत ६९ पैकी १० गावास महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा सुरु आहे. उर्वरित गावांना महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे पाठपुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील हातपंप दुरुस्तीकरिता निधी व वाहन उपलब्ध करून देण्याबाबत

**(५९) * ९३१३९ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ७६७७ हातपंपांपैकी तब्बल ६ हजार ३८८ हातपंप बंद असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्याकडे हातपंप दुरूस्तीचे स्वत:चे वाहन नसल्याने अल्प् निधी उपलब्ध् असल्यामुळे ग्रामीण भागातील हातपंप दुरूस्ती करणे शक्य होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जिल्हयात उन्हाळयात भीषण पाणी टंचाई निर्माण होत असल्याने हातपंप दुरूस्तीसाठी आवश्यक तो निधी व नागरीकांना मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध् करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीकडे हातपंप दुरुस्तीचे स्वतंत्र वाहन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे हातपंप दुरुस्ती कामाकरीता लागणारा निधी पुरेसा असून मोठ्या संख्येत हातपंप बंद राहून भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याची बाब दिसून आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील शासकीय अन्नधान्य गोदामातील धान्य स्वस्त अन्नधान्य दुकानदारांना मोजमाप न करताच देण्यात येत असल्याबाबत

**(६०) * ८९८२९ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील शासकीय अन्नधान्य गोदामातून स्वस्त अन्नधान्य दुकानदारांना मोजमाप न करता धान्य वितरित करण्यात येत असल्याचे तसेच दलाल स्वस्त धान्य दुकानदारांना पैशाचे आमिष दाखवून स्वस्त धान्य १००० ते १२०० रुपये प्रतिक्विंटलने धान्य देत असल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान ग्रामस्थांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांच्या निदर्शनास आणून दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व असल्यास, त्यानुसार सदर गोदामातील कारभार पारदर्शक व सुधारण्याबाबत तसेच सदर गोदामातील दलालांचा वावर रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) "कळमनुरी येथील शासकीय गोदामातील गलथान कारभार सुधारणेबाबत" याविषयाची तक्रार श्री. अशोक गणेशराव मस्के यांनी दि. ०५/०४/२०१७ रोजी तहसिलदार, कळमनुरी यांच्याकडे केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, कळमनुरी यांनी स्वत: दि. २७/०४/२०१७ रोजी चौकशी केली असून, त्यात तथ्य नसल्याचे दिसून आले आहे.

भारतीय अन्न महामंडळाकडून अन्नधान्याची उचल करुन ते शासकीय गोदामात आणले जाते व शासकीय गोदामात अन्नधान्याचे प्रमाणिकरण करण्यात येते. प्रमाणिकरण करतांना प्रत्येक गोणीचे इलेक्ट्रॉनिक वजन काट्यावर वजन करुन ती ५० किलोची बनविण्यात येते. हिंगोली जिल्ह्यामध्ये प्रमाणित करण्यात आलेली गोणी ही द्वारपोच वितरण व्यवस्थेंतर्गत शिधावाटप दुकानदारापर्यंत पोहोच केली जाते. शिधावाटप दुकानदार हे प्रत्यक्ष अन्नधान्याची गोणी मोजून घेत असुन धान्य कमी मिळत असल्याबाबत कोणत्याही शिधावाटप दुकानदाराने तक्रार केलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणार (जि. बुलढाणा) तालुक्यातील अंत्योदयधारकांना साखरेचे वाटप होत नसल्याबाबत

**(६१) * ८७९१७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि. बुलढाणा) तालुक्यातील अंत्योदयधारकांना गहू, तांदूळ, साखर वाटप करणे बंधनकारक असतांनाही गत दोन वर्षापासून अंत्योदयधारकांना साखरेचे वाटप होत नसल्याने चौकशी करण्याची मागणी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे जिल्हा परिषद सदस्य राजेश मापारी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने अंत्योदयधारकांना साखर वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर निवेदनाचे अनुषंगाने लोणार तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानाची जिल्हा पुरवठा अधिका-यां मार्फत चौकशी करण्यात आलेली असून, अंत्योदय धारकांना दुकानदार यांचेकडून नियमानुसार धान्य व साखर वितरीत केल्याचे निर्दशनास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयासह राज्यातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे थकीत असलेले हप्ते मिळण्याबाबत

**(६२) * ८४९७९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय प्रायोजित राष्ट्रीय साधन तथा गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना साठी महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळ पुणे, परीक्षा घेत असून आठवीमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची परीक्षा दिल्यानंतर यामध्ये उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक सहा हजार रूपये या प्रमाणे आठवीपासून बारावीपर्यंत ३० हजार रूपये मिळतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत आलेल्या नागपूरसह विदर्भातील विद्यार्थ्यांना फक्त पहिल्या हप्त्याचे सहा हजार रूपये मिळाले असून तीन ते चार हप्ते थकीत असल्याचे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच केंद्र शासनाने इयत्ता ८ वी साठी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना गत ४ वर्षापासून शिष्यवृत्ती दिली नसल्याने गरीब पण गुणवान विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर जिल्हयासह राज्यातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे थकीत हप्ते मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना इ. ९ वी ते १२ वी अखेर ४ वर्षा करीता दरमहा रु. ५००/- प्रमाणे (वार्षिक रु. ६०००/-) या प्रमाणे चार वर्षासाठी रु. २४,०००/- एवढी शिष्यवृत्ती मिळते.

शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही ही केंद्रशासनामार्फत स्टेट बँक ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडून संबंधित शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर ECS पद्धतीने परस्पर जमा करण्यात येते.
(३) व (४) शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या परंतु खाते क्रमांक चुकीचा असल्यामुळे/विहीत कालावधीत खाते क्रमांक प्राप्त न झाल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली नाही, त्याबाबत केंद्र शासनास पत्रव्यवहार करण्यात आला असून आवश्यक माहिती केंद्र शासनास सादर करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याबाबत

**(६३) * ९३३०० श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) ग्रामीण व शहरी भागात पिण्याच्या तीव्र पाणी टंचाई झाली असून मंगळवेढा शहराला ५ दिवसानंतर पाणी पुरवठा होत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त पाणीटंचाई असलेल्या भागाला वठाण येथील जॅकवेलमधुन पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

मंगळवेढा तालुक्यामध्ये ग्रामीण व शहरी भागात माहे जुलै-२०१७ मध्ये कुठेही तीव्र पाणी टंचाई निर्माण झालेली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## पुणे, पिंपरी-चिंचवड येथील मुळा-मुठा, उजनी नदीतील पाण्यामध्ये मर्यादेपेक्षा अधिक बि.ओ.डी, टोटल कॉलिफार्म व फिकल कॉलिफार्म विषारी तत्व आढळून आल्याबाबत

**(६४) * ८५१९९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच नदीकाठावरील महानगरपालिका, नगरपालिका, गावे क्षेत्रातील सांडपाणी, मैला मुळा-मुठा, उजनी नदीपात्रात मिसळल्यामुळे

नदीतील पाण्यामध्ये मर्यादेपेक्षा अधिक बि.ओ.डी, टोटल कॉलिफार्म व फिकल कॉलिफार्म विषारी तत्व आढळून आल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त जिल्ह्यातील मैलामिश्रित तसेच रासायनिक प्रकल्पातून उत्सर्जित होणारे सांडपाणी थेट मुळा-मुठा, इंद्रायणी नदीत सोडण्यात येत असल्याने नद्यांचे पाणी प्रदूषित होत असल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, वारजे, कर्वेनगर, खडकवासला भागातून नदीच्या प्रदूषणाचे प्रमाण सर्वाधिक असून प्रदूषण करणाऱ्या कंपन्या, कारखान्यांवर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त नद्यांच्या प्रदूषित पाण्यामुळे नागरिकांच्या व जनावरांच्या आरोग्यावर विपरित परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त नद्यांचे शुध्दीकरण करण्याकरिता व प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) रासायानिक प्रकल्पातून उत्सर्जित होणारे सांडपाणी मुळा -मुठा, इंद्रायणी नदीमध्ये सोडण्यात येत नाही. तथापि, नदीकाठावरील महानगरपालिका, नगरपालिका, गावे या क्षेत्रातील घरगुती सांडपाणी नदीपात्रात मिसळत असल्यामुळे पाण्याची गुणवत्ता खालावली आहे ही वस्तुस्थिती आहे

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) राज्यातील नद्यांच्या सर्वेक्षणावरुन आढळून आलेल्या प्रदूषित पट्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत.

• महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दरमहा नदीच्या पाण्याचे पृथ:करण करण्यात येते.

• राष्ट्रीय नदी कृति योजनेंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संवर्धनाच्या अनुषंगाने सांडपाणी संकलन व प्रक्रिया यासाठी केंद्र शासनामार्फत रू. ९९०.२६ कोटी एवढ्या खर्चाचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

• प्रदूषण नियंत्रण मंडळाने उदयोगांना विनाप्रक्रिया सांडपाण्याचा विसर्ग करण्यास बंदी घातलेली असून उदयोगातून निर्मित होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करून प्रक्रियाकृत सांडपाणी बाहेर सोडण्याचे निर्देश दिलेले आहेत.

• राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांना सांडपाणी व नागरी घनकचरा व्यवस्थापनाबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

• नदी प्रदूषणास जबाबदार असलेल्या उद्योग/ स्थानिक स्वराज्य संस्थांवर जल प्रदूषण (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारवाई करण्यात येते.

• राज्यात दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

-----------------

## कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीच्या प्रस्तावाबाबत

**(६५) * ८६४०८ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील २२८ शाळांपैकी ८० शाळांच्या इमारतीचा दुरुस्तीचा प्रस्ताव गत दोन वर्षापासून मंजूरीअभावी प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, शाळांच्या इमारतीची दुरुस्ती न झाल्याने पावसाळयात विद्यार्थ्यांना धोकादायक इमारतीमध्ये बसावे लागणार आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच कांही शाळांच्या इमारती धोकादायक असतांनाही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तद्‌नुसार शाळा इमारतीच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

कणकवली (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील ७४ शाळांचे छप्पर दुरूस्ती व इतर किरकोळ दुरूस्तीचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. ३४ शाळांच्या दुरूस्तीसाठी रू.८४.१९ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

धोकादायक इमारतीत विद्यार्थ्यांना बसविण्यात येत नसून त्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदा, बिबा, आवारपूर, हिरापूर (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) या गांवात पाणीपूरवठा होत नसल्याबाबत

**(६६) * ९३१६३ अ‍ॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदा, बिबा, आवारपूर, हिरापूर (ता.कोरपना,जि.चंद्रपूर) या गांवात जीवन प्रधिकरण योजनेअंतर्गत पाण्याची टाकी बांधण्यात आली असून सदर टाकीमधून गत चार वर्षापासून पाणी साठवणूक व पुरवठा होत नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावात पाणी पुरवठा होत नसल्यामुळे नागरीकांना पिण्याच्या पाण्याची भीषण पाणी टंचाई जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने जीवन प्राधिकरण योजनेअंतर्गत कोटयावधी रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या टाक्यांचा वापर पाणी साठवणूक व पाणी वितरणासाठी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) गाडेगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेद्वारे समाविष्ठ गावांना गावातील टाक्यांद्वारे ग्रामपंचायतीमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

मौजे बिबी, आवाळपूर या गावांना प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा होत आहेत.

मौजा नांदा येथे अस्तित्वातील स्वतंत्र पाणी पुरवठा योजना तसेच गावातील उपलब्ध स्त्रोताद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे. त्यामुळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून पाणी घेण्यात येत नाही.

मौजा हिरापूर येथे प्रादेशिक योजनेद्वारे जलकुंभापर्यंत पाणी पुरवठा होतो. तथापि, ग्रामपंचायतीने वितरण नलिकेची दुरुस्ती न केल्यामुळे योजनेमधून पाणी घेणे बंद आहे. अस्तित्वातील हातपंप, सार्वजनिक विहीरीद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण योजनेअंतर्गत असलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(६७) * ९३३३६ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण योजनेअंतर्गत सन २००८ पासून सुमारे ५०३ कोटी १६लाख रुपयांतून १७ योजनांची कामे केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१६मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,आतापर्यंत फक्त दोनच पाणी पुरवठा पूर्ण करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे उर्वरित १५ योजनांवर कोटयवधीचा निधी अखर्चित असल्याने पुढील वर्षाचा साडेचार कोटी रुपयांचा निधी समायोजित करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर योजनांचे योग्य नियोजन न करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम सन २०१६-१७ च्या आराखडयात १७ योजनांचा समावेश आहे. सदर योजनांची किंमत रु.५०३.१६ लक्ष एवढी आहे.

(२) अंशत: खरे आहे.

डिसेंबर, २०१६ अखेर दोन योजना कार्यान्वित करण्यात आल्या होत्या. तसेच, मार्च, २०१७ अखेर १० योजनांचा पाणी पुरवठा सुरु करण्यात आला.

(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रु.५०३.१६ लक्ष इतका निधी मंजूर आहे. त्यापैकी रु.२४०.२५ लक्ष निधी प्राप्त झाला असुन, रु. २२२.२५ लक्ष निधी खर्च झाला आहे. रु. १८.०० लक्ष निधी शिल्लक असुन अखर्चित निधी समायोजित करावा लागणार नाही.

(४) सदर योजनांची कामे समिती व ठेकेदारामार्फत करण्यात येत आहेत. सन २०१६-१७ च्या आराखडयातील १७ योजनांपैकी १० योजनेचा पाणी पुरवठा चालु करण्यात आला आहे. उर्वरीत ३ योजनांचे उद्भव कोरडे गेल्यामुळे आहे त्या स्थितीत योजना अंतिम करावयाचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

तसेच, सिरली ता.वसमत येथील एका योजनेचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे एका योजनेचे काम समितीतील अंतर्गत वादामुळे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदरील योजनेबाबत कुठलीही कारवाई प्रस्तावित करता आली नाही. तसेच, दोन योजनांची कामे सन २०१७-१८ च्या आराखडयात समाविष्ठ करण्यात आली असुन कामे प्रगतिपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयात मृत व्यक्तीच्या नावे रॉकेलचा परवाना वितरीत केल्याबाबत

**(६८) * ८४९९४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील तहसिल कार्यालय आणि जिल्हा पुरवठा अधिकारी कायार्लयाने गैरव्यवहार करुन दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३ रोजी निधन झालेल्या अब्दुल सलाम अब्दुल सत्तार यांच्या नावे असलेला १६२/९२ रॉकेलचा परवाना श्री. सत्तार यांच्या मृत्युनंतरही पुढे दोन वर्ष सुरू ठेवला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परवान्याची मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संपल्यानंतर दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ रोजी त्यांच्या नावे अज्ञात व्यक्तीने बनावट सही करून उक्त परवान्याच्या नुतनीकरणाच्या सादर केलेल्या अर्जाची तहसिलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांनी कोणतीही शहानिशा न करता दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी मृतकाच्या नावेच परवाना वितरित केला असल्याची माहिती दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, असल्यास, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) सदर परवानाधारकाचे निधन झाले असल्याची बाब निदर्शनास न आल्याने परवानाधारकाच्या मृत्यूनंतर मे, २०१७ पर्यंत केरोसिन कोटा सुरु होता. तसेच सदर परवान्याच्या नूतनीकरणासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर परवान्याचे नूतनीकरण करण्यात आले.

मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल जनहित याचिकेद्वारे परवानाधारकाचे निधन झाले असल्याची बाब दि. २ मे, २०१७ रोजी निदर्शनास आली.

(३) सदर परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांनी दि. ३.५.२०१७ च्या आदेशान्वये रद्द केला आहे.

किरकोळ केरोसिन परवानाधारकाचे निधन झाले असतानाही सदर परवान्यावरील केरोसिनची उचल व वाटप करणारा परवानाधारकाचा मुलगा व जावई यांच्याविरुध्द तसेच घाऊक केरोसिन परवानाधारकाविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणी जबाबदार व दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.